मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १६३ ■ शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# छत्रपती शिवरायांच्या मार्गावर चालणे हाच विकासाचा खरा मार्ग - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## किल्ले शिवनेरीवर छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव साजरा

**पुणे :** छत्रपती शिवरायांनी दिलेला मार्ग हाच सर्वांगीण विकासाचा मार्ग आहे. त्यांच्या कार्याचा हा आदर्श जगासमोर ठेवण्यासाठी २०३० साली छत्रपती शिवाजी महाराजांची ४०० वी जयंती भव्य आणि जागतिक स्तरावर साजरी केली जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार शरद सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अभिनेता रितेश देशमुख, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज नसते तर आज भारताचा इतिहास आणि भूगोलही वेगळा असता असे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अनेक राजे-रजवाडे मोगलांच्या अधिपत्याखाली काम करत असताना आई जिजाऊंनी घडविलेल्या छत्रपती शिवरायांनी रयतेचे स्वराज्य स्थापन करून हिंदुस्थानाला नवी दिशा दिली. छत्रपती शिवरायांनी १८ पगड जातींच्या मावळ्यांना एकत्र करून स्वराज्याची स्थापना केली. 'हे माझे राज्य नसून रयतेचे राज्य आहे,' अशी भूमिका त्यांनी घेतली. देव, देश आणि धर्मासाठी लढा देण्याची प्रेरणा देत त्यांनी सामान्य जनतेला मोगलांच्या जोखडातून मुक्त करण्याचे कार्य केले. त्यांच्या राज्यात समता, सन्मान, न्याय आणि स्त्रीसुरक्षा यांना प्राधान्य होते. शेतकरी समाधानी राहील, अन्याय-अत्याचार होणार नाहीत, अशी राज्यव्यवस्था त्यांनी उभी केली, असे मुख्यमंत्री म्हणाले.

**शिवरायांच्या विचारावर चालणारा बलशाली महाराष्ट्र घडवू- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे युगपुरुष होते. त्यांच्या दूरदृष्टीतून उभे राहिलेले स्वराज्य आजही सुशासनाची प्रेरणा देते. शिवरायांच्या विचारांवर चालत बलशाली व स्वाभिमानी महाराष्ट्र घडविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

महाराजांनी जलव्यवस्था, अर्थकारण व पर्यावरण रक्षणाच्या संकल्पना चारशे वर्षांपूर्वीच राबवल्या. 'शिवराई' ही चलन व्यवस्था त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्यातील गड-किल्ल्यांचे जतन व संवर्धन अधिक वेगाने करण्यात येईल. बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त किल्ले स्वच्छता व जतन मोहीम राबविण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांप्रती महाराजांच्या संवेदनशील धोरणांचा उल्लेख करत बळीराजाला सक्षम करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. स्त्रीसन्मानाची परंपरा जपत 'लाडकी बहीण' योजनेद्वारे महिलांना सक्षम करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जुन्नर तालुका व शिवनेरी किल्ला परिसराच्या विकासाला प्राधान्य देऊन प्रलंबित मागण्या मार्गी लावण्यात येतील, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

**शिवनेरी किल्ला विचार आणि कार्याचे प्रेरणास्थळ- उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासाठी शिवनेरी किल्ला, ही शिवजन्मभूमी केवळ ऐतिहासिक स्थळ नव्हते, तर ते त्यांच्या विचारांचे आणि कार्याचे प्रेरणास्थळही होते. पवित्र शिवनेरी किल्ल्याविषयी केवळ जिव्हाळाच





नव्हता, तर या शिवजन्मभूमीचे सौंदर्य वाढावे, तिचा ऐतिहासिक वारसा जपला जावा आणि भावी पिढ्यांना अभिमानाने दाखवता यावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या पुढाकारातून 'किल्ले शिवनेरी विकास आराखडा' साकार झाला आणि या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला.

गेल्या वर्षी युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत किल्ले शिवनेरीचा समावेश झाला आहे. त्यापूर्वीच शिवजन्मभूमी शिवनेरीसह राज्यातील गडकोटांच्या जतन-संवर्धनासाठी त्यांनी निधीची तरतूद केली होती. केवळ शिवनेरी किल्ल्यापुरते मर्यादित न राहता, शिवजन्मभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जुन्नर तालुक्याला पर्यटन तालुका म्हणून विकसित करण्याचा संकल्प त्यांनी ध्यासाने घेतला होता आणि त्या दिशेने ठोस पावले उचलली होती.

गेल्या अर्थसंकल्पात आग्रा येथे महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणारे शिवस्मारक उभारण्याचा निर्धार, पानिपत येथे मराठा शौर्य स्मारक तसेच संगमेश्वर येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाचा समावेश आहे, असा संकल्प करण्यात आला होता.

किल्ले रायगड विकास आराखडा व स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान स्थळ तुळापूर आणि समाधी स्थळ वढू बुद्रुक येथे स्मारकाचे काम अत्यंत वेगाने सुरु असून ही सर्व कामे प्रगतीपथावर आहेत. या प्रत्येक स्मारकातून भावी पिढ्यांना प्रेरणा, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचा संदेश मिळत राहणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील प्रत्येक घटकाची काळजी घेण्याची शिकवण आपल्याला दिली असून त्याच विचारांवर आणि रयतेचं राज्य' या संकल्पनेवर राज्य सरकार पुढे वाटचाल करीत आहे. शिवछत्रपतींच्या स्वप्नातील सुजलाम सुफलाम, न्याय आणि समृद्ध स्वराज्य घडवण्यासोबतच यापुढेही महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध राहील, असा विश्वास उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी व्यक्त केला.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विधान भवनात अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** हिंदवी स्वराज्याचे सरसंस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज गुरुवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी विधान भवनातील त्यांच्या सिंहासनाधिष्ठीत पुतळयास महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव -१ श्री.जितेंद्र भोळे आणि सचिव-३ डॉ.विलास आठवले यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय याचे सचिव -४ श्री.शिवदर्शन साठ्ये, उप सचिव श्री.विजय कोमटवार, मा.उप सभापती यांचे खाजगी सचिव आविनाश रणखांब, संचालक, वि.स.पागे, संसदीय प्रशिक्षण केंद्र आणि जनसंपर्क



अधिकारी, म.वि.स. श्री.निलेश मदाने यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास गुलाबपुष्प अर्पण करुन अभिवादन केले.सकाळपासूनच विधान भवनाचा परिसर तुतारी-सनई-चौघडयाच्या निनादाने दुमदुमून गेला होता. पारंपरिक वेषातील तुतारीवादक हे या शिवजयंती सोहळयाचे वैशिष्टय ठरले.

## विक्रोळीकरांच्या वतीने नगरसेविका सुनिता चंद्रशेखर जाधव यांना २३ मागण्यांचे निवेदन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** बुधवार दिनांक १८.०२.२६ रोजी विभाग ११८ च्या नवनिर्वाचित नगरसेविका सौ.सुनीता चंद्रशेखर जाधव यांची विक्रोळीकरांनी भेट घेऊन त्यांना २३ मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यामध्ये विक्रोळीकर विकास मंचचे अध्यक्ष संजय येवले,राजाराम राव, कन्नमवार नगर हाऊसिंग सोसायटी फेडरेशन युनियन अध्यक्ष सुरेश सरनोबत, संजय मयेकर, बॉम्बे कॅथलिक सभेचे रॉबर्ट डिसोझा आणि दिशा ग्रुप अध्यक्ष दिनेश बेरीशेट्टी आदि उपस्थित होते.ही संयुक्त बैठक टागोर नगर येथील साई मंदिरात संपन्न झाली.याप्रसंगी शिवसेना उबाठा उपविभाग प्रमुख चंद्रशेखर जाधव यांची विशेष उपस्थिती होती.यात



११८ विभागातील, कन्नमवार नगर व टागोर नगर मधील विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. नगरसेविका जाधव यांनी आश्वासित ही केले की आपल्या सर्वांच्या सहकार्याने समस्यांचे निराकरण करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करीन.समस्यांच्या निवेदनात विक्रोळी परिसरातील अनधिकृत फेरीवाले व फूटपाथवरील अतिक्रमणांवर मुंबई महानगरपालिका व स्थानिक पोलिस प्रशासनाच्या मदतीने तात्काळ व सातत्यपूर्ण कारवाई करावी, धर्मवीर संभाजी महाराज उद्यान परिसरात व विक्रोळी रेल्वे स्टेशन पूर्व जवळ सार्वजनिक शौचालय व्यवस्था व्हावी,

कन्नमवार नगर येथून हायवेखाली स्मशानभूमीकडे जाण्यासाठी सुरक्षित पादचारी बोगदा तयार करण्यात यावा,कन्नमवार नगर परिसरात उभारल्या जात असलेल्या नव्या उंच इमारतींच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा व मलनिस्सारणासाठी नवीन लाईन्स टाकण्यात याव्यात. यासाठी म्हाडा व मनपा यांच्यातील प्रलंबित वादात मध्यस्थी करून पायाभूत सुविधा तातडीने कार्यान्वित कराव्यात,

नियोजनबद्ध, सुसज्ज भाजी, मासे व मटण मार्केट तसेच डी-मार्टसारख्या मॉलची उभारणी करण्यात यावी, ज्यामध्ये अनधिकृत दुकाने वा फेरीवाले नसतील आणि नागरिकांसाठी चालण्यास योग्य रस्ते व फुटपाथ उपलब्ध असतील, खाडी परिसरात तिवरांच्या झाडांची कत्तल करून अनधिकृतरीत्या उभारलेल्या झोपडपट्ट्यांमुळे पर्यावरणीय व नागरी समस्या निर्माण होत आहेत. पात्र रहिवाशांचे पीएपी अंतर्गत पुनर्वसन करून अनधिकृत नळजोडण्या व सांडपाणी समस्यांवर उपाययोजना कराव्यात, नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने कन्नमवार नगरमध्ये पर्यायी रुग्णालय किंवा बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना तातडीने सुरू करण्यात यावा, विक्रोळी पूर्व परिसरासाठी स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारण्यात यावे. (सध्या कांजूरमार्ग प्रस्तावित केंद्र अपुरे आहे.)आदि २३ मागण्या आहेत.

## सणसरमध्ये रमजान महिन्याचे जोरदार स्वागत

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** सणसर ता.इंदापूर येथील मुस्लिम बांधवांनी रमजान महिन्याचे जोरदार स्वागत केले आहे.पहाटेच्या पहिल्या अजानपासूनच गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. मशिदींमध्ये नमाजासाठी गर्दी उसळली असल्याचे दिसून येत आहे उपवासाच्या पवित्र महिन्याची सुरुवात भक्तिभावाने करण्यात आली आहे. गावातील गल्लीबोळ सजवले गेले आहेत,तर घराघरांतून इफ्तारच्या तयारीचा सुगंध दरवळत आहे.तरुण मंडळींनी मशिदींची स्वच्छता करून दिव्यांनी सजावट केली आहे.रमजानच्या आगमनाने सणसरमध्ये



धार्मिक उत्साहाबरोबरच सामाजिक ऐक्याचे दर्शन घडत आहे. स्थानिक मुस्लिम नेते माजी चेअरमन शब्बीर काझी व माजी ग्रामपंचायत सदस्य अजीजभाई तांबोळी यांनी सांगितले की,रमजान महिना हा आत्मशुद्धीचा संयमाचा आणि दानधर्माचा महिना आहे उपवासाद्वारे आत्मिक शिस्त वाढवण्याबरोबरच गरीब-गरजूंसाठी मदतीचे हात पुढे करण्याची परंपरा गावात जपली जाते.गावातील ज्येष्ठांनी तरुणांना रमजानचे महत्त्व समजावून सांगितले."रमजान हा केवळ उपवासाचा महिना नाही,तर तो आत्मिक चिंतनाचा आणि समाजातील बंधुभाव वाढवण्याचा काळ आहे,"असे एका ज्येष्ठांनी सांगितले. सणसरमध्ये रमजानचे स्वागत केवळ धार्मिक विधींनीच नव्हे तर सामाजिक उपक्रमांनीही रंगतदार होत असते. दरवर्षी गावातील विविध संघटनामार्फत इफ्तार कार्यक्रमांचे आयोजन केले जाते,रमजानच्या शेवटी सर्व धर्मीय बांधवांना शीरखुर्मा पिण्यासाठी सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले जाते .

## श्रीवर्धनमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव उत्साहात; शाही मिरवणुकीने वातावरण दुमदुमले

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव आज श्रीवर्धन शहरासह परिसरातील गावांमध्ये मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर आधारित कार्यक्रम, भाषणे आणि पारंपरिक उपक्रमांचे आयोजन करून शिवरायांना अभिवादन केले.यावेळी मावळा संघटना



श्रीवर्धन यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची आकर्षक शाही मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वेशभूषेत सजलेले शिवभक्त, लेझीम पथके, ढोल-ताशांचा गजर आणि भगव्या पताकांनी शहरातील वातावरण शिवमय झाले होते.मिरवणुकीचे अनेक ठिकाणी गावोगावी उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. पारंपरिक नृत्यप्रकार आणि सांस्कृतिक सादरीकरणांमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच नागरिकांनी उत्सवात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.एकंदरीत, शिवरायांच्या विचारांचा जागर आणि ऐतिहासिक परंपरेचा अभिमान व्यक्त करत आजचा जन्मोत्सव श्रीवर्धनमध्ये अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

# जेएनपीए’तील निर्यातीला वाहतूक कोंडीचा फटका

## कंटेनर टर्मिनल प्रवेशद्वारांवर तासन्तास रांगा; द्राक्ष, केळी,कांदा खराब होण्याची भीती

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : नवी मुंबईतील न्हावा-शेवा येथील जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण परिसरात निर्माण झालेल्या तीव्र वाहतूक कोंडीमुळे उत्तर महाराष्ट्रातील कृषी निर्यातीला मोठा फटका बसत आहे. गेटवे टर्मिनल आणि भारत मुंबई कंटेनर टर्मिनलच्या प्रवेशद्वारांवर तासन्तास लागणाऱ्या रांगांमुळे द्राक्षे, कांदा आणि केळी यांसारखा नाशवंत माल वेळेत जहाजापर्यंत पोहोचत नसल्याची गंभीर तक्रार निर्यातदारांकडून करण्यात आली आहे.



हॉर्टिकल्चर उत्पादन निर्यातदार संघटनेने सीमा शुल्क विभागाकडे सादर केलेल्या निवेदनात परिस्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे नमूद केले आहे. टोल प्लाझा परिसरातील सुरू असलेली रस्ते कामे आणि अपुरी प्रवेशद्वारे यामुळे वाहनांची मोठी कोंडी होत आहे. आठ प्रवेशद्वारांपैकी काहीच सुरू असल्याने ट्रक तासन्तास रांगेत अडकून पडत आहेत.दररोज 8 ते 9 जहाजे बंदरात दाखल होत असल्याने वातानुकूलित कंटेनर्ससाठी आवश्यक असलेल्या प्लग पॉइंट्सची कमतरता भासत आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यास किंवा वेळेत माल जहाजावर न चढवल्यास नाशवंत माल खराब होण्याचा धोका वाढतो. परिणामी निर्यातदारांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान आणि दंड सहन करावा लागत आहे.टोल प्लाझामधून बाहेर पडण्यासाठी 24 तास तर टर्मिनलपर्यंत पोहोचण्यासाठी आणखी 12 ते 24 तास लागत असल्याने 48 तासांची निर्यातीची मर्यादा ओलांडली जाते. त्यामुळे माल जहाजावर चढविणे अशक्य होते, अशी खंत निर्यातदारांनी व्यक्त केली आहे.

संघटनेचे उपाध्यक्ष विकास सिंग यांनी सीमा शुल्क आयुक्त संजय पै यांची भेट घेऊन नाशवंत मालाच्या कंटेनर्ससाठी स्वतंत्र आणि जलद मार्ग उपलब्ध करून द्यावा, जहाजांच्या गर्दीच्या काळात पार्किंग प्लाझाची सर्व प्रवेशद्वारे खुली ठेवावीत, रस्ते प्राधिकरणाशी समन्वय साधून प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत आणि बंदरात वातानुकूलित कंटेनर्ससाठी विजेची अतिरिक्त सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशा मागण्या केल्या.वाहतूक कोंडीमुळे परदेशी खरेदीदारांना दिलेली आश्वासने पाळणे कठीण होत आहे. यामुळे जागतिक बाजारपेठेत भारतीय निर्यातदारांची प्रतिमा धोक्यात येत आहे. प्रशासनाने तातडीने तोडगा काढणे आवश्यक आहे, असे विकास सिंग यांनी सांगितले.

सीमा शुल्क आयुक्त संजय पै यांनी समस्येची दखल घेत आवश्यक ती पावले उचलण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, तातडीने उपाययोजना न झाल्यास कृषी निर्यातीवर दीर्घकालीन परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे

## श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था आणि आई माऊली ग्राम संघातर्फे मोफत महिला आरोग्य शिबिर संपन्न!

### मेमोग्राफी व पेप्समेयर चाचणीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी** : महिलांच्या आरोग्य प्रति जागरूकता निर्माण करण्यासाठी श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण आणि आई माऊली महिला ग्राम संघ यांच्या संयुक्त विद्यमाने १८ फेब्रुवारी रोजी करंजा येथे मोफत मेमोग्राफी आणि पेप्समेयर तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. करंजा ग्रुप ग्रामपंचायत चांणजे येथील द्रोणागिरी देवीच्या मैदानात सकाळी१० ते दुपारी १ या वेळेत शिबिर पार पडले. त्या शिबिरासाठी एमओसी कॅन्सर केअर सेंटर पनवेल यांचे तांत्रिक सहकार्य लाभले. सेंटरचे नितीन पटेल, विजय औटी, सतीश पारेकर, ऋतुषा बामणे ,शगुप्ता खान यांनी उपस्थित महिलांचे




आरोग्य तपासणी करून त्यांना मार्गदर्शन केले .कर्करोगाचे वेळेत निदान व्हावे या उद्देशाने मेमोग्राफी आणि महत्त्वाच्या चाचण्या यावेळी विनामूल्य करण्यात आल्या. त्याचप्रमाणे उरणमधील सुप्रसिद्ध डॉ अजय कोळी आणि डॉ. विकास मोरे यांचेही योगदान महत्त्वाचे आहे या सामाजिक उपक्रमासाठी श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्थेच्या अध्यक्षा संगीता ढेरे, कविता म्हात्रे आणि अभया म्हात्रे यांनी विशेष मेहनत घेतली. तसेच आई माऊली ग्राम संघाच्या अध्यक्षा अनु पाटील,नैना पाटील ,उज्वला म्हात्रे, तृप्ती घरत आणि निशा म्हात्रे यांचे शिबिराच्या नियोजनात मोठे योगदान लाभले. या शिबिराला परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली. ग्रामीण भागातील महिलांसाठी अशा प्रकारच्या अत्याधुनिक वैद्यकीय चाचण्या विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल आयोजकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## केकत सारणी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती पारंपरिक पद्धतीने साजरी

**दैनिक युवक आधार**

**केज प्रतिनिधी/शरद गिराम** : केज तालुक्यातील केकत सारणी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती यंदा अत्यंत पारंपारिक व उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. गावकऱ्यांनी एकत्र येत कोणत्याही प्रकारचा कर्कश आवाज करणारा डॉल्बी न लावता ढोल-ताशे, लेझीम, टिपरे आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढून एक आदर्श निर्माण केला.

सकाळी लवकर ग्रामस्थांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून



कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर सजवलेल्या बैलगाडीतून महाराजांची प्रतिमा ठेवून गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक पोशाख परिधान केलेले युवक, लेझीम खेळणाऱ्या महिला व मुली, तसेच शिवकालीन वेशभूषेत सहभागी झालेले लहान मुले हे मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले. “जय भवानी, जय शिवाजी” च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

यावेळी आंबा साखर कारखान्याचे चेअरमन मा. रमेशरावजी आडकर साहेब व ऋषीकेश भैया आडसकर साहेब यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यांनी उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेतील कार्याचा उल्लेख करून युवकांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले. सामाजिक ऐक्य, शिस्त आणि पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमात गावातील सर्व लहान मुले, महिला, पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तरुणांनी नियोजन, शिस्त व व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडत जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. विशेष म्हणजे, ध्वनीप्रदूषण टाळत पारंपरिक पद्धतीने सण साजरा करण्याचा घेतलेला निर्णय सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरला. संपूर्ण गावाने एकजुटीने आणि उत्साहाने जयंती साजरी करून समाजापुढे एक आगळावेगळा आदर्श निर्माण केला. केकत सारणी येथील ग्रामस्थांनी परंपरा जपत सुसंस्कृत आणि पर्यावरणपूरक पद्धतीने जयंती साजरी करून खऱ्या अर्थाने शिवरायांच्या विचारांना अभिवादन केले.

## रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊनतर्फे ज्येष्ठ पत्रकार संजय कदम व्होकेशनल एक्सलन्स ॲवॉर्ड ने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊनतर्फे आयोजित विशेष कार्यक्रमात गेली २५ वर्षे सातत्याने विविध वृत्तपत्रात पत्रकारिता करणारे त्याचप्रमाणे सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे ज्येष्ठ पत्रकार संजय कदम यांच्या कामाची व कार्याची दखल घेत त्यांना व्होकेशनल एक्सलन्स अवॉर्ड देवून गौरविण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊनचे अध्यक्ष रो. निलेश पोटे, सचिव रो.हितेश राजपूत, खजिनदार जितेंद्र बालड, डायरेक्टर रो. विजय मेढेकर, संजय जैन, डॉ. जयश्री पाटील, देवयानी पोटे यांच्यासह रोटरीचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन पनवेल येथील स्व. पावर्तीबाई महादेव सावळेकर रोटरी सभागृह येथे हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या



वेळी सौ. मेघना संजय कदम यांनी प्राणिक हेलींग आणि मेडीटेशन या संदर्भात उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच त्यांच्या शंकांचे निरसन केले. या कार्यक्रमांतर्गत अध्यक्ष निलेश पोटे यांनी आगामी रोटरी क्लब तर्फे घेण्यात येणाऱ्या विविध प्रोजेक्ट संदर्भात त्यामध्ये प्रामुख्याने माहिती दिली. यात अस्मिता प्रोजेक्ट त्यामध्ये सॅनिटरी पॅड, वेडीग मशिनचे शाळांना वाटप, स्कील लॅब प्रोजेक्ट, तसेच जल पुर्नजीवन प्रोजेक्ट संदर्भात माहिती दिली.

## जेएनपीएमध्ये इराणहून आलेले 309 ड्रायफ्रुट कंटेनर जप्त ; 50 कोटींचे सीमाशुल्क बुडविण्याचा प्रयत्न उघड

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : जेएनपीए न्हावा शेवा बंदरात केंद्रीय डीआरआय आणि मुंबई सीमा शुल्क विभागाने संयुक्त कारवाई करत इराणमधून आलेल्या 309कंटेनरमधील सुका मेवा जप्त केला आहे. या आयातीतून सुमारे 50 कोटी रुपयांचे सीमाशुल्क बुडविण्याचा प्रयत्न झाल्याचा पर्दाफाश झाला असून याप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

कोमोरोस देशाचा ध्वज असलेले ‘वीव रियफा’ हे मालवाहू जहाज इराणच्या बंदर अब्बास येथून 309 कंटेनर घेऊन जेएनपीए बंदरात दाखल झाले होते. गुप्त माहितीच्या आधारे डीआरआयने जहाजाला दोन आठवडे रोखून धरत सखोल तपासणी केली. तपासात कंटेनरमधील सुका मेवा, विशेषतः आक्रोड, हा अफगाणिस्तानचा नसून अन्य देशातील असल्याचे स्पष्ट झाले. मात्र आयात शुल्कात सवलत मिळवण्यासाठी तो अफगाणिस्तानचा असल्याचे खोटे कागदपत्र सादर करण्यात आल्याचे उघड झाले.

दक्षिण आशियाई मुक्त व्यापार करार (एसएएफटीए) अंतर्गत अफगाणिस्तानातून येणाऱ्या मालावर शून्य आयात शुल्क लागू होते. याच तरतुदीचा गैरफायदा घेत बनावट ट्रान्झिट कागदपत्रे, बिल ऑफ लॅडिंग आणि ई-संचित प्रणालीवर खोटी माहिती अपलोड करून मालाची मूळ ओळख लपविण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले. बंदर अब्बास ते जिबेल अली (यूएई) या प्रवासाचेही बनावट दस्तऐवज तयार करण्यात आले होते.

या कारवाईनंतर सीमा शुल्क विभागाने संबंधित आयातदारांकडून मालाच्या किमतीएवढी बँक हमी मागितली आहे. दरम्यान, या कारवाईविरोधात एका आयातदाराने मुंबई हाय कोर्ट येथे दाद मागितली आहे.

सध्या जहाजातील कागदपत्रांची न्यायवैज्ञानिक तपासणी सुरू असून पुढील चौकशीअंती अधिक कारवाई केली जाणार असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली. या तस्करीमुळे स्थानिक सुका मेवा व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त होत असून, रमजानपूर्वी मोठ्या प्रमाणावर बाजारात माल उतरवण्याचा डाव उधळण्यात आल्याची चर्चा व्यापारी वर्तुळात सुरू आहे.

## शुक्रवारपासून रामशेठ ठाकूर मैदानावर रंगणार कबड्डीचा थरार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवस वर्ष निमित्ताने श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने उलवेनोडमध्ये आयोजित करण्यात आलेल्या रायगड जिल्हास्तरीय प्रौढ महिला आणि पुरुष गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी २०२६ स्पर्धेचा उदघाटन सोहळा शुक्रवार दिनांक २० फेब्रुवारीला सकाळी ११ वाजता लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली व आमदार महेश बालदी यांच्या हस्ते होणार आहे.

उलवे नोडमधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल जवळील रामशेठ ठाकूर मैदानावर होणाऱ्या या स्पर्धेच्या उदघाटन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून



माजी नगराध्यक्ष ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, पनवेल महानगरपालिकेच्या उपमहापौर प्रमिला पाटील यांची तर श्री. शिव छत्रपती पुरस्कार विजेते प्रमोद म्हात्रे, श्री. शिव छत्रपती पुरस्कार विजेते सुर्यकांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तर या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा रविवार दिनांक २२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ०६ वाजता पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या समारंभाचे अध्यक्ष म्हणून पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी सरकार्यवाह ॲड. आस्वाद पाटील यांची तर अर्जुन पुरस्कार विजेते शकुंतला खटावकर, अर्जुन पुरस्कार विजेते अभिलाषा म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

आगामी राज्यस्तरीय स्पर्धेच्या धर्तीवर जिल्ह्याचा संघ निवड करण्याच्या दृष्टीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेत जिल्ह्यातील १९८ पुरुष कबड्डी संघ आणि ३२ महिला संघ सहभागी होणार आहेत. यातून निवड झालेल्या खेळाडूंचा संघ महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाच्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये रायगडचे प्रतिनिधित्व करणार आहे. या स्पर्धेच्या अनुषंगाने जवळपास १०० पंच कार्यरत असणार आहेत. सुसज्ज अशी चार क्रीडांगणे त्याचबरोबर मुख्य स्टेज, प्रशस्त प्रेक्षक गॅलरी, प्रथमोपचार केंद्र, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच इतर पूरक सुविधा या ठिकाणी आहे.

या स्पर्धेचा कबड्डी रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हा राज्य कबड्डी असोसिएशनचे कार्यवाह चित्राताई पाटील, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, स्पर्धा संयोजन समितीचे सचिव शरद कदम यांनी केले आहे.

## हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवराय यांच्या जयंतीनिमित्त हिवरा (संगम) येथील छत्रपती शिवरायांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे/महागाव** : प्रभु श्रीरामानंतर महिलेचा आदर करणारा एकमेव राजा म्हणजे छत्रपती शिवराय आहेत असे प्रतिपादन ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.माधवराव माने पाटील यांनी केले आहे.हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवराय यांच्या जयंतीनिमित्त हिवरा (संगम) येथील छत्रपती शिवरायांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण व चौक सौंदर्यीकरण कामाच्या लोकार्पण सोहळ्यात उद्घाटक म्हणुन ते बोलत होते.पुढे बोलतांना ॲड.माने म्हणाले की,आज देशात महिलांवरील अत्याचारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असुन याला आळा घालण्याकरिता छत्रपती शिवरायांनी ज्या प्रमाणे महिलेवर अत्याचार करण्याचे हातपाय



तोडले व जरब बसविली, परस्त्रीस मातेचा दर्जा दिला.तीच शिकवण सताधाऱ्यांनी अंमलात आणण्याची गरज आहे. जगात प्रभु श्रीरामानंतर परस्त्रीचा आदर करणारा एकमेव राजा जर कोणी असेल ते छत्रपती शिवराय आहेत. आज देशातील तरुण पिढीला छत्रपती शिवरायांचे विचार अंगीकारण्याची गरज आहे तेव्हाच स्वराज्याचे सुराज्य निर्माण होईल असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आ.नामदेवराव ससाणे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणुन भाजपा जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, ॲड.रमेश पाटील, ॲड.अनिल माने,माजी जि. प.सदस्य साहेबराव पाटील, माजी जि. प. सदस्या,जिल्हा बँकेच्या संचालिका सौ.स्मितताई साहेबराव पाटील, सरपंचा सौ.मेघाताई शिरीष बोरुळकर, उपसरपंच शरद पाटील, पोलिस पाटील प्रविण कदम ,माजी सभापती ललिताबाई वसंतराव जामकर, शिवसेना तालुका प्रमुख रविंद्र भारती,पत्रकार गजानन वाघमारे,सेवानिवृत्त मुख्याध्यापक मुकुंद पांडे,विजय बोंपिलवार,शफीसेठ सुरैय्या,अशोक जयस्वाल, ग्रा. पा. सदस्य पंजाब पाटील, राजु धोतरकर,अशोक पाटील,माजी सरपंच डॉ. धोंडेराव बोरूळकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाला गावकरी मंडळी,शिवभक्त ,महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक साहेबराव पाटील यांनी केले आहे संचलन राजु गिरी यांनी केले तर आभार महेश कामारकर यांनी मानले.या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी छत्रपती शिवराय चौक समितीचे अध्यक्ष देवेंद्र कदम,उपाध्यक्ष सुनिल चव्हाण,सचिव महेश कामारकर,कोषाध्यक्ष मुकुंद जामकर,सहसचिव माजी सरपंच प्रविण जामकर ,सदस्य किरण काळे,अनिल मुडेवाड, निलेश करमोडकर,शेख फिरोज,रोहित फाळके, संतोष पिंपळे,सुदर्शन कदम, प्रदीप कदम,विनोद कदम, सोनु भैसे यांनी अथक परिश्रम घेतले.

## उरण तालुका दैनिक पत्रकार संघाकडून गोंधळी परिवाराचे सांत्वन

**दैनिक युवक आधार**

**उरण शहर प्रतिनिधी/ सायली साळुंके** : ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक व कवी धनंजय चिंतामण गोंधळी यांचे नुकतेच वृद्धपकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच, उरण तालुका दैनिक पत्रकार संघाच्या पदाधिकारी व सदस्यांनी बुधवारी (दि.18) रोजी धनंजय गोंधळी यांच्या चिरनेर कातळपाडा येथील निवासस्थानी जाऊन, संजय गोंधळी, बबन गोंधळी, प्रकाश गोंधळी, प्रथमेश गोंधळी, शेखर गोंधळी, सुहास गोंधळी, प्रतीक गोंधळी यांच्यासह त्यांच्या




अन्य कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. दरम्यान पत्रकार गोंधळी साहेबांच्या स्मृतींना अभिवादन करून, जुन्या आठवणींना उजाळा दिला. याप्रसंगी उरण तालुका दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष जगदीश तांडेल, सचिव मधुकर ठाकूर, ज्येष्ठ पत्रकार प्रदीप पाटील, माजी अध्यक्ष जिवन केणी, उपाध्यक्ष दिनेश पवार, माजी सचिव दत्तात्रेय म्हात्रे, सदस्य मनोज पाटील, पंकज ठाकूर तसेच अन्यजण उपस्थित होते.

# शिक्षण प्रसारक मंडळ घाटंजी तर्फे सात दिवसीय रासेयो शिबिराचे आयोजन

## "स्वतःच्या जबाबदारीची जाणीव ठेवा" - सुरज हेमके

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी/महेश पेन्दोर** : घाटंजी : शि. प्र. मं. विज्ञान व गिलानी कला , वाणिज्य महाविद्यालय घाटंजीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उदघाटन दत्तकग्राम खापरी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. एस. माहूरे होते. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य डॉ. एम. ए. शहजाद तसेच दत्तक ग्राम खापरी येथील ग्राम पंचायत सरपंच सौ. कल्पना काकडे होत्या. प्रमुख वक्ते श्री सुरज हेमके यांचा परिचय कु. चेतना तिजारे या विद्यार्थिनीने करून दिला. प्रमुख वक्ते म्हणून जिव्हाळयाची भिंत अन्नदान छत्र चॅरिटेबल ट्रस्टचे श्री सुरज हेमके उपस्थित होते, त्यांच्या मार्गदर्शनामध्ये विद्यार्थ्यांना स्वतःच्या जबाबदारीची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी चा संदेश मिळाला.

उद्घाटनाच्या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सी.आर. कासार, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.कविता किर्दक, सह कार्यक्रम



अधिकारी प्रा. एस. एन. मोरे, डॉ. नागलक्ष्मी तीरमनवार, प्रा.जयश्री मोरे, प्रा. चेतन शहाकर, प्रा. करण किनाके प्रा. डॉ. अमित ओळंबे, प्रा. प्रदीप राठोड, प्रा.मंथन डंभारे, इत्यादी प्राध्यापक वृंद आणि श्री. अचलभाऊ गिरी, श्री.प्रतिक ढोके इत्यादी शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सी.आर कासार, आभार प्रदर्शन कु. दिपाली जाधव या विद्यार्थिनीने, स्वागतगीत कु . त्रिशा दिकुंडवार या विद्यार्थिनीने सादर केले व संचालन श्री. एस. एन मोरे यांनी केले..

# आमदार. प्रा.राजुभाऊ तोडसाम यांच्या उपस्थितीत विशेष श्रम संस्कार शिबिराचा समारोप संपन्न"

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी/महेश पेन्दोर** : घाटंजी तालुक्यातील खापरी येथे दिनांक १८/०२/२०२६ रोजी शि.प्र.मं. विज्ञान व गिलानी कला, वाणिज्य महाविद्यालय, घाटंजी जि. यवतमाळ यांच्या

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आयोजित विशेष श्रम संस्कार शिबीर समारोपिय कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन मा. आ. प्रा. श्री. राजूभाऊ तोडसाम ,आणि दत्तकग्राम खापरीच्या सरपंच्या सौ. कल्पनाताई काकडे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये संपन्न झाला,सर्व प्रथम मान्यवरांचे स्वागत करण्यात आले,स्वच्छतेचे प्रणेते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पुजन व हारार्पण करून विद्यापीठ




गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली.मा. प्रा.आमदार राजुभाऊ तोडसाम यांनीयुवकांच्या सहभागातून शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापन व पडीक जमीन विकास या उपक्रमांना प्रोत्साहन देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला व मार्गदर्शन केले,त्यांनी आपल्या मार्गदर्शनीय भाषणात रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. चंद्रशेखर रा.कासार,महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. कविता आर.किर्दक सह-कार्यक्रम अधिकारी प्रा.सुहास मोरे,यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी केलेले राष्ट्रीय कार्यक्रम व श्रमदान तसेच समाजहित कार्यक्रम कौतुकास्पद असुन विद्यार्थ्यांनी नेहमी उपक्रमशील असावे व देशहितासाठी कार्य करावे असे मत व्यक्त केले,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. वाय. एस.माहुरे यांनी आपल्या मार्गदर्शन भाषणातून शिबिरार्थी स्वयंसेवकांना शिबिरातील शिस्त व कार्यतत्परतेचे कौतुक केले,दत्तकग्राम खापरीच्या सरपंच्या सौ.कल्पनाताई काकडे यांनी शिबिरार्थी विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून ग्रामस्वच्छता अभियान, बेटी बचाव जनजागृती रॅली,वनराई बंधारा इत्यादी कामाचा आनंदव्यक्त करून शुभेच्छा दिल्या. दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ पासुन दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीतील आयोजित श्रमसंस्कार शिबिराचे यशस्वीतेकरीता प्रा.करण किनाके,प्रा.प्रणित ठाकरे, प्रा. डॉ.अमित ओळंबे, प्रा.चेतन शहाकार,प्रा. प्रदीप राठोड, प्रा. डॉ. सलिम शेख, प्रा. राजेंद्र घोडिले, प्रा. कु. जयश्री मोरे, प्रा. अशोक सोनटक्के, प्रा. डॉ. एन.एस. धारकर, प्रा.डॉ. एम.एच.ढाले, माजी रा.से. यो.कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. व्हि.एस.जगताप,प्रा.डॉ. प्रदिप राऊत ,श्री .प्रतिक ढोके, व महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. शिबिरा दरम्यान उत्कृष्ट शिबिरार्थी म्हणून श्री. निशांत राऊत व कु.तन्वी पांगुळ या विद्यार्थ्यांना मा. आ. प्रा. राजुभाऊ तोडसाम यांच्या हस्ते बक्षिस देऊन त्यांच्या सत्कार करण्यात आला.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# सोयगाव शहरात शिवजयंतीचा जल्लोष; लेझीम भगव्या उत्साहाची दिमाखदार झलक

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे** : सोयगाव शहरात अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत, स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सोयगाव शहरात यंदा अभूतपूर्व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. काही कारणास्तव दिनांक १८ फेब्रुवारी रोजी प्रारंभी जयंती साजरी करण्यात आली,तर दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी मुख्य जयंती सोहळा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मोठ्या जल्लोषात पार पडला.

सकाळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे विधिवत पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शहराचे माजी नगराध्यक्ष कैलास दहा काळे तसेच नगरसेवक बंटी भाऊ काळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सर्वपक्षीय नेते, नगरसेवक, पदाधिकारी



व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यानंतर जिल्हा परिषद हायस्कूल व जिल्हा परिषद कन्या शाळेतील विद्यार्थिनींनी भगवे फेटे परिधान करून लेझीम पथकासह भव्य मिरवणूक काढली. शिस्तबद्ध पावलांचा ताल, ढोल-ताशांचा नाद आणि 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी संपूर्ण शहर दणाणून गेले. ही मिरवणूक शहरासाठी आगळीवेगळी आणि लक्षवेधी ठरली. मिरवणुकीचे विशेष आकर्षण म्हणजे भगवानराव पंडित यांची मुलगी माता जिजाऊ यांच्या वेशभूषेत मानसी पंडित हिने साकारलेली भूमिका. तिच्या प्रभावी सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशात विद्यार्थिनी पुष्पा नागपुरे हिने देखील सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांचे जिवंत दर्शन घडवणाऱ्या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.

शहरातील प्रमुख मार्गांवरून मिरवणूक काढण्यात आली. ठिकठिकाणी शिवरायांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मिरवणूक पाहण्यासाठी गर्दी केली होती. संपूर्ण शहर भगव्या रंगात न्हाऊन निघाले होते.या दिव्य सोहळ्याचे सलग पाच वर्ष अध्यक्ष पद नगरसेवक बंटी उर्फ हर्षल काळे होते,तर उपाध्यक्ष रोप शेख हे होते.कार्याध्यक्ष म्हणून पत्रकार विजय काळे यांनी जबाबदारी सांभाळली. सचिव संदीप चौधरी यांच्यासह सल्लागार रवी काळे,कैलास दादा काळे,एडवोकेट योगेश पाटील,नगरसेवक राजू दुतोडे,संतोष बोडखे,गजानन कुडके,किशोर मापारी,लतीप शहा,ॲड. योगेश पाटील,समाजसेवक अंकुश पगारे,अरुण सोहनी, भैया जुनघरे आदी मान्यवर उपस्थित होते.शाळेतील शिक्षक भास्कर चौधरी,किरण पाटील,बोरसे मॅडम,तसेच सर्व मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंद यांनी मिरवणुकीत सक्रिय सहभाग नोंदवला.मिरवणुकीचा समारोप भवानी मंदिराजवळ करण्यात आला. समारोप प्रसंगी नगरसेवक राजू दुतोडे यांनी उपस्थित सर्व मान्यवर, विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांचे आभार मानले. सोयगाव शहरातील ही शिवजयंती केवळ उत्सव नव्हे, तर शिवविचारांचे आणि स्वाभिमानाचे दर्शन घडवणारा ऐतिहासिक क्षण ठरला. युवक-युवतींमधील शिवप्रेम आणि संस्कारांची परंपरा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी दृढ करण्यात आला.

# नाचून नाही वाचून" सपकळवाडीत शिवजयंतीनिमित्त नवा उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : सपकळवाडी गावात यंदा शिवजयंती उत्सवाला वेगळा आणि प्रेरणादायी रंग चढला आहे.पारंपरिक डीजे वाजवण्याची प्रथा बंद करून गावकऱ्यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र पुस्तक वाटपाचा उपक्रम करण्यात आला हभप शंतनू महाराज गिरी गेवराई यांच्या हस्ते शिवाजी महाराजांचे पूजन करण्यात आले.गावातील युवकांनी एकत्र येऊन हा निर्णय घेतला."शिवजयंती ही केवळ जल्लोषाची नव्हे तर प्रेरणेची पर्वणी आहे महाराजांचे विचार आणि कार्य लोकांपर्यंत पोहोचवणे हेच खरी शिवजयंती"असे मत आयोजकांनी व्यक्त केले. कार्यक्रमात उपस्थितांना शिवचरित्राची पुस्तके वाटण्यात आली.

ज्येष्ठांनी शिवाजी महाराजांच्या शौर्यकथा आणि आदर्श शासनपद्धतीवर भाष्य केले. गावातील महिलांनीही या उपक्रमात सक्रिय



सहभाग घेतला.या उपक्रमामुळे गावात शैक्षणिक आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले आहे.तरुण पिढीला महाराजांचे विचार वाचून आत्मसात करण्याची संधी मिळत आहे."डिजेच्या गोंगाटाऐवजी पुस्तकांचा सुगंध आणि विचारांचा प्रकाश पसरवणे हेच आमचे उद्दिष्ट,"असे आयोजकांनी स्पष्ट केले.सपकळवाडीतील हा उपक्रम जिल्ह्यातील इतर गावांसाठीही आदर्श ठरू शकतो.शिवजयंतीला ज्ञानाचा उत्सव बनवण्याचा हा प्रयत्न सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे.यावेळी ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

# सहकार महर्षी माणिकराव पालोदकर विद्यालयात शिवजयंती उत्साहात ; शिवरायांच्या जयघोषाने परिसर दुमदुमला !

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर / सिल्लोड** : तालुक्यातील पालोद येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. 'निश्चयाचा महामेरू' असलेल्या राजा शिवछत्रपतींच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण करत, शालेय परिवाराच्या वतीने या युगपुरुषाला कृतज्ञतापूर्वक मानवंदना देण्यात आली. सोहळ्याचा प्रारंभ मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन व दीपप्रज्वलन करून झाला. प्रमुख अतिथी दिलीप जाधव यांनी महाराजांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण



करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी दिलेल्या 'जय भवानी, जय शिवाजी' च्या उत्स्फूर्त घोषणांनी संपूर्ण शालेय परिसर शिवमय झाला होता. महाराजांचे स्वराज्यप्रेम, व्यवस्थापन कौशल्य आणि आदर्श प्रशासकीय विचार नव्या पिढीने आत्मसात करावेत, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या मंगलमयी सोहळ्याप्रसंगी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक राजेश ठोंबरे, सुनील सागरे, प्रफुल कळम, डॉ. रमेश काळे, भास्कर केरले आणि अक्षय निकम यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी शालेय प्रशासनातील सर्व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध उपस्थितीने या सोहळ्याची शोभा अधिकच वाढवली होती. शिवरायांच्या विचारांचा जागर करत, आदर्श नागरिक घडवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# मातोश्री विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** प्रबोधन संस्था संचलित मातोश्री प्राथमिक विद्यालय, प्रबोधन नगर, जळगाव येथे संस्थेचे अध्यक्ष मा. ॲड. माजी आमदार जयप्रकाश बाविस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि मांगल्याच्या वातावरणात साजरी करण्यात आली. जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी संपूर्ण शाळा परिसर दुमदुमून होऊन गेला होता.

कार्यक्रमाची सुरुवात प्रबोधन संस्थेचे प्रशासकीय अधिकारी ॲड .श्री कैलास सोनार व शाळेचे मुख्याध्यापक श्री समाधान इंगळे यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली.इयत्ता पहिली ते इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या जीवनावर आधारित भाषणे व नृत्य सादर केले. यावेळी लोकेश कुंभार ,प्रियांका सोळुंके सेजल शिरसाळे ,हेतल कोळी, उन्नती पवार, श्रुती कुंभार, कल्पेश देवराज, प्रांजल सोनवणे, ला जर बाविस्कर समर शीरसाळे, वंश कोळी ,सना तडवी, आरती पवार ,हेमांगी सोनवणे प्रियांशी



पवार ,रुपेश पवार , कुणाल राठोड, मयूर ठाकरे ,पूजा देवराज, देविका बाविस्कर ,ज्ञानेश्वरी देवराज, आदिती वानखेडे दिव्या कोळी. या विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या जीवनावर मनोगत व्यक्त केले. इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी दैवत छत्रपती या गाण्यावर नृत्य सादर केले. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी माय भवानी या गाण्यावर नृत्य सादर केले. तसेच इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनींनी आम्ही शिवकन्या या गाण्यावर नृत्य सादर केले. तसेच श्रीमती वैशाली पाटील यांच्या मार्गदर्शनाने इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी शिवरायांचे गड किल्ले तसेच शस्त्र तयार करून प्रदर्शन भरवण्यात आले. प्रशासकीय अधिकारी ॲड .कैलास सोनार यांनी सर्व विद्यार्थी व शिक्षक यांचे अभिनंदन केले. मुख्याध्यापक समाधान इंगळे यांनी रयतेचा राजा म्हणजे नेमके काय?? छत्रपती शिवाजी महाराज यांचे शेतकऱ्यांविषयीचे धोरण आणि राज्यकारभाराविषयी नेमकी माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता सातवी ची विद्यार्थिनी तेजस्वी जगदीश बाविस्कर हिने केले तर आभार प्रदर्शन प्राथमिक शिक्षिका श्रीमती कविता गावित यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक समाधान इंगळे,समाधान ठाकरे, शारदा मोहिते, वैशाली पाटील, कविता गावित,मिलिंद नाईक, प्रमोद झलवार, माधुरी मोरे यांनी परिश्रम घेतले.

# सेलूत स्व .जनुभाऊ रानडे स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन ; २३ व २४ फेब्रुवारीला व्याख्यानमाला

**दैनिक युवक आधार**

**सेलू/प्रतिनिधी** : भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित, स्वामी विवेकानंद शैक्षणिक संकुल आयोजित तथा देवगिरी नागरी सहकारी बँक म.छत्रपती संभाजीनगर प्रायोजित स्व.जनुभाऊ रानडे स्मृती व्याख्यानमालेचे दि.२३ व २४ फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आले आहे. शहरातील नूतन विद्यालयातील रा.ब.गिल्डा सभागृहात दोन पुष्पांत सायंकाळी ६ वाजता व्याख्यान होणार आहेत. व्याख्यानमालेचे हे १४ वे वर्ष आहे.२३ फेब्रुवारी(सोमवार) रोजी समग्र ज्ञानेश्वर माऊली या विषयावर निवृत्त जिल्हाधिकारी तथा ज्ञानेश्वरी अभ्यासक विजयकुमार फड यांचे व्याख्यान होणार आहे. यावेळी अध्यक्ष म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह हेमंत वैद्य उपस्थित राहणार आहेत.२४ फेब्रुवारी (मंगळवार) रोजी संघ शताब्दी-कार्य आणि जबाबदारी या विषयावर भा.शि.प्र.संस्थेचे माजी कार्यवाह तथा पूर्व इतिहास विभागप्रमुख खोलेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई ,शरदराव हेबाळकर यांचे व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी देवगिरी नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे उपस्थित राहतील.व्याख्यानमालेस नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन स्व.जनुभाऊ रानडे स्मृती व्याख्यानमाला संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# नगर परिषद शिवाजी विद्यामंदिरात सांस्कृतिक जल्लोष ; शिवचरित्रावरील नृत्याने प्रेक्षक मंत्रमुग्ध, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाले भव्य व्यासपीठ

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** :' वाशिमनगर परिषद शिवाजी विद्यामंदिर येथे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, शिक्षक-विद्यार्थी नाते अधिक दृढ व्हावे तसेच विद्यार्थ्यांच्या मनातील शाळेविषयीची भीती दूर व्हावी या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उत्साहाचा नवा उच्चांक गाठला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक नृत्यांनी उपस्थित मान्यवर आणि पालकांची मने जिंकत कार्यक्रम अविस्मरणीय ठरवला.

कार्यक्रमाचे उद्घाटन नगर परिषद उपाध्यक्ष मा. श्री. राजूभाऊ भांदुर्गे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिक्षण सभापती श्री. कुणालजी हेडा, मुख्याधिकारी श्री. गायकवाड तसेच इतर मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे मनापासून कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होतो व त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रीय संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या पारंपरिक वेशभूषेत सादर केलेली नृत्ये विशेष आकर्षण ठरली. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावर



आधारित सादर करण्यात आलेल्या नृत्याने उपस्थितांना इतिहासातील शौर्य, त्याग आणि प्रेरणेची जाणीव करून दिली. या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली आणि संपूर्ण परिसर टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेला.

कार्यक्रमाचे नियोजन श्री. काळबांडे सर यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने केले. सूत्रसंचालन श्री. बोरकर सर व श्री. नितीन जाधव सर यांनी प्रभावीपणे पार पाडले, तर आभार प्रदर्शन श्रीमती भारतीय मॅडम यांनी केले. विद्यार्थिनींच्या पारंपरिक वेशभूषेची जबाबदारी शाळेतील महिला शिक्षकांनी कुशलतेने सांभाळली.या सांस्कृतिक कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांचे मुक्तपणे सादरीकरण करण्याची संधी मिळाली असून नगर परिषद शिवाजी विद्यामंदिरच्या उपक्रमशीलतेचे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीच्या कटिबद्धतेचे पुन्हा एकदा प्रभावी दर्शन घडले.

# जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग** : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी त्यांच्या



प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, तहसिलदार स्नेहलता पाटील यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# आदिशक्ती किड्स प्री प्रायमरी इंग्लिश स्कूल उमरी येथे शिवजन्मोत्सव साजरा

**दैनिक युवक आधार**
**उमरी वार्ताहर :** उमरी येथे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती निमित्ताने आदिशक्ती किड्स प्री प्रायमरी इंग्लिश स्कूल उमरी येथे शिवजन्मोत्सव मोठया उत्सवात साजरा करण्यात आला.



प्रथम दिप प्रजवलन करत छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून बाल स्वरूपातील शिवरायांचे पाळणा गीत म्हणत पाळणा करत अभिवादन करण्यात आले.

विद्यार्थी यांच्या वतीने शिवरायांचे विविध देखावे सादर करन्यात आले. देखावे च्या माध्यमातुन शिवरायांचा इतिहास सांगण्यात आले उपस्थित सर्व शिक्षक वृंदाच्या वतीने विद्यार्थाना मार्गदर्शन करत शिवजन्मोत्सवा च्या शुभेच्या देण्यात आले .

# भावी कलाकारांचा रंगमंचावर दमदार आविष्कार

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी/ गेवराई : गेवराई** तालुक्यातील मादळमोही येथील संत तुकाराम इंटरनॅशनल स्कूल वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. संत तुकाराम यांच्या पवित्र नावाने प्रेरित संत तुकाराम इंटरनॅशनल स्कूल येथील विद्यार्थी केवळ शैक्षणिक प्रगतीतच नव्हे, तर कला क्षेत्रातही आपली वेगळी छाप उमटवत आहेत. शाळेत विविध सांस्कृतिक उपक्रम, नृत्य, गायन, नाट्य सादरीकरण अशा कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळत आहे.



विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षक सातत्याने मार्गदर्शन करत आहेत. त्यामुळे अनेक विद्यार्थी आत्मविश्वासाने मंचावर आपली कला सादर करत असून भावी कलाकार म्हणून घडत आहेत. त्यांच्या अभिनय, गायन याने शाळेचे नाव परिसरात उज्ज्वल होत आहे.

शिस्त, परिश्रम आणि योग्य दिशा मिळाल्यास हेच विद्यार्थी भविष्यात मोठे कलाकार बनून समाजात आणि देशात आपले वेगळे स्थान निर्माण करतील, यात शंका नाही. कार्यक्रमाचे उद्घाटन श्री राजाभाऊ गर्जे (पोलीस उपनिरीक्षक, गेवराई) यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून श्री राम बारहाते (पोलीस उपनिरीक्षक, पाचोड) श्री अशोक नाईकवाडे (पोलीस उपनिरीक्षक) उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी श्री बापूसाहेब तारुकर( क्रीडा समन्वयक गेवराई)होते.

या वेळी युवा नेते मच्छिंद्र यादव, युवा नेते उद्धव तळेकर,सामाजिक कार्यकर्ते रमेश जीजा तळेकर, केशव गावडे, मेरड सर ,राक्षे सर ,भोपळे सर ,बाळासाहेब गावडे,पत्रकार शरद शेजाळ, इंग्लिश स्कूल संघटनेचे पदाधिकारी श्री चाटे सर चाटे इंग्लिश ,श्री देशमुख सर संत ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूल ,श्री गिराम सर चाईल्ड इंग्लिश स्कूल केज, श्री राठोड सर रायसीना इंग्लिश स्कूल सुशी,श्री सातपुते सर सनराईज् इंग्लिश स्कूल पिंपळनेर, श्री येवले सर ,येवले इंटरनॅशनल स्कूल ,श्री माळकर सर ,संस्कार इंग्लिश स्कूल चौसाळा ,श्री मुंडे सर, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक साईनाथ गावडे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. अध्यक्षांनी पालक-शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील समन्वयाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यामध्ये पालकांना मला मनाला भावणारे नाटक सादर करण्यात आले वृद्धाश्रम व आजचा पालक छावा महा नट्याचा जिवंत देखावा यामध्ये उपस्थितांच्या डोळयांमध्ये पाणी आले.यावेळी विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटिका, गीत व देशभक्तीपर सादरीकरणांद्वारे आपल्या कलागुणांची झलक सादर केली. त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन संचालक साईनाथ गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. आकर्षक सजावट,ध्वनीव्यवस्था व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या परिश्रमामुळे कार्यक्रम यशस्वी ठरला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे सूत्रसंचालन श्रीमती शिवनंदा गावडे यांनी केले.या कार्यक्रमासाठी श्रीमती आशा मिस ,कल्पना मिस, सारिका मिस,अबोली मिस ,खांडे मावशी .सिद्धार्थ सर, लखन सर ,नागेश शेळके, सौरभ पौल,संतोष गंगाधर ,अमर पौल राजू गावडे यांनी परिश्रम घेतले.एकूणच हा स्नेहसंमेलन सोहळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रतीक ठरला.

# बांबु बीजधारणा एक दुर्मिळ नैसर्गिक घटना

**दैनिक युवक आधार**
**रिसोड. प्रतिनिधी/रणजित सिहं. ठाकूर** : बांबूची उंची,त्यांचे रंग-रूप,पोकळ व भरीवपणा इत्यादी गुणधर्मा नूसार भारतामध्ये एकूण 140 बांबूच्या प्रजाती आढळतात.बांबू रोप निर्मिती हि सहसा परिपक्व बांबूच्या पेरकांडाच्या जोडावर आलेल्या डोळया पासून करतात.पण बांबू लागवडीपासून साधारणत: 50 वर्षानंतर बांबुच्या प्रत्येक पेरकांडाना फुले लागून तपकिरी रंग व तांदुळाच्या आकाराची बीज निर्मिती होते हि एक दुर्मिळ नैसर्गिक घटना आहे असे वक्तव्य वृक्षमित्र गजानन मुलंगे ह्यांनी रिसोड स्थित नामदेव गाडे ह्यांच्या शेतामध्ये बीजधारी बांबूच्या बेटाचे निरीक्षणं करतांना केले. ह्या अदभुत नैसर्गिक घटनेचे निरीक्षक चमू मध्ये अरविंद ईढोळे लागवड अधिकारी,प्रमोद जावळे वनरक्षक,संदीप डांगे वनमजूर सामाजिक वनिकरणं विभाग वाशिम



परिक्षेत्र रिसोड,गजानन कोरडे पोलीस पाटिल रिसोड प्रामुख्याने उपस्थित होते. कोणत्याही प्रकारच्या व विविध ठिकाणी केलेल्या बांबू लागवडीनंतर साधारणत: 50 ते 120 वर्षादरम्यान फूलरूपी बीजधारणा होऊ शकते आणि ही दुर्मिळ नैसर्गिक घटना घडत असताना बांबूचे बेट त्याच्या जीवनक्रमाच्या अंतिम टप्प्यामध्ये असते अर्थात बीजधारणेनंतर बांबूचे बेट पूर्णपणे वाळते.बांबुच्या बीयांना आदिवासी बहुल क्षेत्रामध्ये "बांस का चॉवल" सुध्दा म्हणतात.सदर्हु बीजा मध्ये भरपूर प्रमाणात फायबर,प्रोटीन, कार्बोहायड्रेट इतकेच नव्हे तर जिवनसत्वे A,B1,B2,B3,B6 आढळून येतात.त्याचप्रमाणे ह्या बीज्यांच्या सेवनाने पुरुषामध्ये शुक्रजंतूंची संख्या आणि स्त्रियांची प्रजनन क्षमता सुध्दा भरपूर प्रमाणात वाढते हे तेवढेच खरे.कोलेस्ट्रॉलचे प्रमाण नगण्य असल्याकारणाने ह्या बियांच्या सेवनाने लठ्ठपणावर आळा बसेल. एवढ्या आयुर्वेदिक औषधी चा खजाना असणारे कदाचित हे एकमेव बियाणे असेल ह्यात तिळमात्र शंका नाही. बियांच्या उत्पादन क्षमतेमध्ये 50 वर्षाच्या फार मोठा कालावधी असल्याकारणाने बाजारामध्ये ह्या बियांची उपलब्धता फारच कमी आहे तरी पण आभासी अर्थात "ऑनलाईन पध्दतीने" बीज उपलब्ध होऊ शकते हे तेवढेच खरे.कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता संजू गाडे,शंकर थोरात,मदन चौधरी,गुणवंत थोरात ईत्यादिंनी मोलाचे सहकार्य केले.

# उंबरठाण महाविद्यालयात हळदी–कुंकू व पारितोषिक वितरण कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** डांग सेवा मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय, उंबरठाण येथे विद्यार्थिनी विकास मंच अंतर्गत हळदी-कुंकू व सांस्कृतिक विभागाच्या वतीने गुणगौरव पारितोषिक वितरण कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमातून महिला पालकांमध्ये एकोप्याची भावना निर्माण करणे तसेच हळदी-कुंकू या पारंपरिक धार्मिक उपक्रमाला सामाजिक स्वरूप देण्याचा प्रयत्न महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा.कलावती थविल यांनी हळदी-कुंकू परंपरेचे महत्त्व स्पष्ट केले. संक्रांतीपासून रथसप्तमीपर्यंत हा सण साजरा करण्यामागील धार्मिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी थोडक्यात सांगितली.



यानंतर श्रीमती. लीला गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमात महिलांसाठी उखाणे, संगीत खुर्ची आदी मनोरंजक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी मोठ्या उत्साहाने व मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. या प्रसंगी महाविद्यालयात आयोजित सांस्कृतिक डे व विविध स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व चषक प्रदान करून गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. एकनाथ आहेर होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी महिलांनी स्वतःच्या विकासासाठी केलेल्या संघर्षाचा गौरव करत, महिलांनी स्व-विकासासाठी सातत्य ठेवावे व महाविद्यालयीन कार्यक्रमांत सक्रिय सहभाग वाढवावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कार्यक्रम समन्वयक प्रा. कलावती थविल यांनी केले. प्रा. सुभाष पवार, प्रा. किशोर काळे, प्रा. सारिका पागी, प्रा. मंदिप राऊत, प्रा. राजाराम कणसे, प्रा. तुळशीराम चौधरी, प्रा. राजेश पेटार, प्रा. हेमलता महाले, प्रा. मधुकर गावित, श्री. अनिल ठाकरे, श्री. हिरामण गावित, श्रीमती. यशोदा गावित यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रयत्न केले.

# शेलगाव राजगुरे येथे RPI ची कार्यकारणी गठीत व सभा संपन्न



**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी/रणजित सिहं. ठाकूर** : रिसोड तालुक्यातील शेलगाव राजगुरे येथे दिनांक 09/02/2026 रोजी RPI खोब्रागडे या पक्षाची बेठक पार पडली. प्रथमतःमहापुरुषांची दीप धूपाने करण्यात आले .त्यानंतर महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष श्री. कैलासजी हिरवाळे साहेब यांनी पक्ष बांधनी करिता मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच वाशिम जिल्हा प्रभारी श्री. नितीनजी खिल्लारे यांच्या उपस्थिती मध्ये वाशिम जिल्हा कार्यकारणी चे पद वाटप करण्यात आले. वाशिम जिल्हा अध्यक्ष स्थानी श्री. अंकुश श्रावण सोनुने यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच जिल्हा सचिव श्री. राजरतन भालेराव, जिल्हा उपाध्यक्ष विकास कळंबे, जिल्हा युवा अध्यक्ष वाशीम विकास खंडारे, जिल्हा युवा उपाध्यक्ष त्रिशरण मोरे, जिल्हा युवा उपाध्यक्ष राहुल जाधव, तर जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष वाशीम जिल्हा सौं. पल्लवी राजरतन भालेराव, श्री. ओंकार विठोबा खंडारे तालुका अध्यक्ष (कलावंत ) हे होते.या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा. संजय भालेराव व आभार प्रदर्शन अंकुश जी. सोनवणे यांनी केले.

# अकोला येथे रिअल इस्टेट लीगल अवेअरनेस संवाद कार्यक्रम भव्य स्वरूपात संपन्न, जनप्रतिनिधींचा मजबूत पाठिंबा

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादक** : भारतीय रियल एस्टेट सलाहकार / एजेंट वेलफेयर यूनियन यांच्या वतीने आयोजित “रिअल इस्टेट लीगल अवेअरनेस संवाद कार्यक्रम” कृषक भवन, डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला येथे उत्साहपूर्ण व गरिमामय वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाला रिअल इस्टेट सल्लागार, एजंट, बिल्डर्स व डेव्हलपर्स यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री अनूपजी धोत्रे (खासदार) होते. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी सांगितले की रिअल इस्टेट सल्लागारांनी संघटित राहून युनियन अधिक बळकट केल्यास त्यांच्या समस्या संसदेत प्रभावीपणे मांडण्यासाठी ते सदैव तत्पर राहतील. त्यांनी जास्तीत जास्त सदस्य संघटनेशी जोडण्याचे आवाहन केले.

विशेष पाहुण्या मा. शारदा खेडकर (महापौर) यांनी कार्यक्रमास शुभेच्छा देत स्थानिक पातळीवर सहकार्य करण्याची ग्वाही दिली. NAREDCO शी संबंधित सुनील इनानी यांनी आपल्या भाषणात सर्व रिअल इस्टेट एजंटांनी महाराष्ट्र रेरा प्रशिक्षण घेणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले. संपूर्ण कायदेशीर ज्ञान, पारदर्शकता आणि व्यावसायिक प्रामाणिकतेच्या आधारावरच खरा व विश्वासार्ह सल्लागार तयार होतो, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी संघटनेला पूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान युनियनचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष राजवीर सिंह यांनी भूषविले. त्यांनी संघटनेची उद्दिष्टे, सल्लागारांचे अधिकार, सुरक्षा व सन्मान याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. उपस्थित सदस्यांना प्रश्न विचारण्याची




संधी देण्यात आली व सर्व शंकांचे समाधान करण्यात आले.

राष्ट्रीय कार्यकारिणीतून राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष संजय कृपान, राष्ट्रीय सचिव मोहन बडवाइक, राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रदीप मनवर व राष्ट्रीय उपाध्यक्ष संजय खोब्रागडे यांची विशेष उपस्थिती होती. राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रदीप मनवर यांनी प्रस्तावना मांडली, तर मोहन बडवाइक व संजय कृपान यांनी संघटनेच्या भावी वाटचालीबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

अकोला जिल्हा कार्यकारिणीतून जिल्हाध्यक्ष आतिश तायडे, जिल्हा कार्यकारी अध्यक्ष निलेश देशपांडे, जिल्हा सचिव विठ्ठल चिंतामणे तसेच संपूर्ण टीम सक्रियपणे उपस्थित होती. तहसीलदार, पत्रकार बांधव व इतर मान्यवरांचीही उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन पवन वानखेडे (मीडिया प्रमुख, अकोला जिल्हा) यांनी उत्कृष्टरीत्या केले. उपस्थित सदस्यांचा उत्साह आणि सहभाग उल्लेखनीय होता, ज्यामुळे कार्यक्रम प्रेरणादायी ठरला.समारोप प्रसंगी संस्थापक अध्यक्ष राजवीर सिंह यांनी सर्व मान्यवरांचे व उपस्थित सदस्यांचे आभार मानून संघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला. अकोला येथे आयोजित हा कार्यक्रम रिअल इस्टेट क्षेत्रात कायदेशीर जागरूकता, एकजूट आणि व्यावसायिक बळकटी देणारा ठरला.

# संविधान जागृती प्रश्नमंजूषा उपक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक/नागपूर विभाग** : महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या संविधान जागृती प्रश्नमंजूषा २०२५-२६ या उपक्रमांतर्गत ऑनलाईन संविधान प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत आयोजित विशेष सत्रात प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीश (नागपूर खंडपीठ) न्या. एम. एस. जावळकर यांनी विद्यार्थ्यांना संविधान विषयक मार्गदर्शन केले.महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांच्या पुढाकारातून आयोजित संविधान जागृती प्रश्नमंजूषा २०२५-२६ या राज्यव्यापी उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. संविधानाबद्दल सखोल ज्ञान, लोकशाही मूल्यांची जाणीव आणि सामाजिक न्यायाची बांधिलकी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.तज्ज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी नागपूर येथील डॉ. कैलास वसावे, डॉ. दिविता कोठेकर, डॉ. आरती तायडे, डॉ. व्ही. पी. तिवारी तसेच महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी मुंबई येथील डॉ. जगदीश खोब्रागडे, डॉ. साहिली सुरजुसे व डॉ. अमोल चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.न्या. श्रीमती एम. एस. जावळकर यांनी विद्यार्थ्यांना संविधान विषयक अमूल्य मार्गदर्शन केले. त्यांनी भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार, कर्तव्ये, समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.या विशेष सत्रात न्या. आर. सी. चव्हाण, न्या. पृथ्वीराज चव्हाण, माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित तसेच माजी आयुक्त समाज कल्याण इ. झेड. खोब्रागडे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनाल अ. थुल यांनी केले. कार्यक्रमास डॉ. जगदीश खोब्रागडे, डॉ. साहिली सुरजुसे व डॉ. आरती तायडे यांची उपस्थिती लाभली. विशेष म्हणजे राज्यातील विद्यार्थिनींचा मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविण्यात आला.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# प्रभात मित्र मंडळात शिवजयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी** : विक्रोळी कन्नमवार नगरातील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळात प्रभात समयी शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.या प्रसंगी मंडळाचे सल्लागार मुंबईचे माजी महापौर दत्ता दळवी,मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड, सचिव ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे,उपाध्यक्ष निवृत्ती मस्के,माजी अध्यक्ष व कार्यकारिणी सदस्य सुरेश सरनोबत,माजी अध्यक्ष,ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक कृष्णा काजरोळकर,माजी सचिव संजय मयेकर आदिंची भाषणे झाली.ज्याच्या हृदयात छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव नाही.तो हिंदु



होत नाही.शिवाजी महाराज मनात नाही रक्तारक्तात आहे. महाराजांचा पुतळा पाहिला की,महाराजांच्याबद्दल प्रत्येक गोष्ट आठवते असे गौरवोद्गार माजी महापौर दत्ता दळवी यांनी काढले.प्रभातच्या गायक मंडळीनी शुर गीते गाऊन वातावरण प्रफुल्लित केले होते.

मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड यांनी महाराष्ट्र गीत गाऊन ज्येष्ठ नागरिकांची मने जिंकली. कार्यक्रमास मंडळाचे सल्लागार चित्रोळीकार मुकुंद कुलकर्णी,वासुदेव कदम,मंडळाचे उपसचिव श्रध्दानंद निकम, खजिनदार गौतम नि.डांगळे यांच्यासह ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी,जय शिवाजी या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

# घरफोडी करणारे आरोपी गजाआड

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका** : भारतीय न्याय संहिता माहीती प्राप्त गुप्तबातमीदार मार्फत फिर्यादीचे नाव श्री. गिरीश बळीराम लोणारे,वय ५९ वर्ष, रा. बजरंग नगर, गल्ली नं. ०८, शाहु कॉलनी, प्लॉट नं. बी/३, पो. ठाणे अजनी, नागपुर शहर

दि. ०८/०२/२०२६ रोजी चे रात्री २०:०० वा. ते दि.०९/०२/२०२६ रोजी चे सकाळी ०८:३० वा. दरम्यान आरोपी पियुष उर्फ भांजा राजु उर्फ राजेश शाहु वय २२ वर्ष रा.सम्यक बुध्द विहाराजवळ,बारासिंगल पो.ठा इमामवाडा, नागपुर दि. ०९/०२/२०२६ रोजी चे १८:४६ वा. स्टे.डा. नोंद क. ४४/२६ दि. १२/०२/२०२६ रोजी चे २२:४८ वा. स्टे.डा. नोंद क. ५३/२६ अन्वये जप्त कि.अं. ३५,०००/- रू. एक पिवळया धातुची चैन वजनी अं. ०५ ग्रॅम २) कि.अं. ६,०००/- रू.एक जोड पांढ-या धातुच्या पायपट्या वजनी अं. २५ ग्रॅम ३) कि.अं. १,५००/- रू. एक पांढ-




या धातुचा सिक्का वजनी अं. ०५ ग्रॅम

४) कि.अं. ४२,०००/- रू. एक पिवळया धातुचे पदक वजनी अं. ०६ ग्रॅम ५) कि.अं. १४,०००/- रू. पिवळया धातुचे एकुण ३० बारीक मनी वजनी अं. ०२ ग्रॅम६) कि.अं. १४,०००/- रू. पिवळया धातुचे कानातील दोन रिंग वजनी अं. ०२ ग्रॅम७) कि.अं. ३,५००/- रू. पिवळया धातुचे कानातील दोन बाली वजनी अं. अर्धा ग्रॅम ८) कि.अं. ६,०००/- रू. एक जोड पांढ-या धातुच्या पायपट्या वजनी अं. २५ ग्रॅम असा एकुण १,२२,००० रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला यातील फिर्यादी हे त्यांचे परीवारासह नातेवाईकाचे लग्न समारंभाकरीता खापरी, नागपुर येथे घराला कुलुप लावुन गेले व परत आले असता घराचे कुलुप तुटलेले दिसले व घरातील सामान अस्तव्यस्त पडलेले दिसले तेव्हा फिर्यादी त्यांनी कपाटातील नमुद सोन्या चांदीचे व नगदी असा एकुण ७१,००० रू. चा मुद्देमाल दिसुन आला नाही. तो कुणीतरी अज्ञात ईसमाने घराचे कुलूप तोडुन आतमध्ये प्रवेश करून घरून नमुद वर्णनाचे दागीने व रोख रक्कम चोरून नेली अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो. ठाणे अजनी, नागपुर शहर येथे गुन्हा कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ (अ) भारतीय न्याय संहिता अन्वये नोंद करण्यात आला.सदर गुन्हयाचे तपासादरम्यान यातील आरोपी बाबत गुप्त बातमीदार यांचे माहीती वरून अटक करून मुदतीमध्ये मा. न्यायालयात हजर करण्यात आले होते त्याचा दि. १६/०२/२०२६ रोजी पावेतो पीसीआर घेण्यात आला होता.सदर आरोपीताकडे पीसीआर दरम्यान केलेल्या तपासामध्ये त्याने दिलेल्या दोन पंचासमक्ष कबुली निवेदनानुसार गुन्हयात चोरीस गेलेल्या मुद्देमाल दोन पचासमक्ष जप्त करण्यात आला सदरची ची कामगिरी ही,मा. पोलीस आयुक्त, श्री डॉ रविन्द्र कुमार सिंगल नागपुर शहर, मा. सहा पोलीस आयुक्त सो, श्री नवीनचंद्र रेड्डी नागपुर शहर, मा अप्पर पोलीस आयुक्त सो, शिवाजी राठोड दक्षिण विभाग नागपुर शहर, मा पोलीस उपआयुक्त सो, श्री रश्मीता राव परिमंडल क ०४, नागपुर शहर, मा सहा पोलीस आयुक्त सो, श्री नरेन्द्र हिवरे अजनी विभाग, नागपुर शहर यांचे मार्गदर्शनात करण्यात आली, यावेळी नितीनचंद्र राजकुमार व.पो.नि पो. ठाणे अजनी नागपुर शहर,प्रभाकर कवाळे पो.नि (गुन्हे),सिंध्दांत मस्के पोलीस उपनिरिक्षक,पो. हवा शालीराम शेन्डे ब.नं २३८६, पो.अ/१७५५ नितीन सोमकुंवर ,पो. अ/१७५२ अश्वीन सहारे , पो.अ/४६४ प्रवीण खवसे,पो.अ/१४१७८ रोशन वाडीभस्मे,चा.म. पो.शि/२१३६२ रेशमा खान पो. ठाणे अजनी नागपुर शहर यांनी केली.

# वांगी बुद्रुक येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी ; शालेय विद्यार्थ्यांचे लेझीम पथक अन् शिवगर्जनांनी परिसर दुमदुमला

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड** : तालुक्यातील वांगी बुद्रुक येथे अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरी करण्यात आली. यावेळी गावातील विविध संस्था आणि संघटनांच्या वतीने आयोजित कार्यक्रमांनी संपूर्ण गाव शिवमय झाले होते.जयंतीनिमित्त गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित कार्यक्रमात माजी सरपंच बापुराव





काकडे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालय व शिवप्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित सोहळ्यात सरपंच सौ. ज्योतीताई साळवे व सामाजिक कार्यकर्ते बाळू साळवे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. लहुजी क्रांती सेनेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात पोलीस कर्मचारी यतीन कुलकर्णी व ग्रामसेवक एल. आर. कोळी यांच्या हस्ते शिवरायांना अभिवादन करण्यात आले. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी काढलेली प्रभातफेरी ठरली. शिवराय आणि मावळ्यांची वेशभूषा परिधान केलेल्या विद्यार्थ्यांनी लेझीमच्या तालावर आणि शिवरायांच्या गीतांवर सुंदर नृत्य सादर केले. 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी गावातील वातावरण भारावून गेले होते.याप्रसंगी ग्रामसेवक एल. आर. कोळी, पोलीस पाटील चंद्रकांत जाधव, सोसायटी चेअरमन माधवराव साळवे, माजी व्हाईस चेअरमन रघुनाथ साळवे, ग्रा.पं. सदस्य पोपटराव साळवे, नारायण काकडे, कैलास साळवे, विष्णू साळवे, माजी पोलीस पाटील भगवान साळवे, संतोष साळवे, ग्रामरोजगार सेवक सुरेश साळवे, डॉ. अनिल साळवे, तंटामुक्ती अध्यक्ष भारत काकडे, माधवराव तायडे, संतोष काकडे, लहुजी क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब गायकवाड, गंगाधर साळवे, जेबासखा पठाण, युनुस पठाण, अमोल साळवे, विजय काकडे, रवी काकडे, रंगनाथ किकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सुनील विठ्ठल सुंसुद्रे, शिक्षक संतोष दाभाडे, रामदास सतुके, माजिद पठाण, बाबू तायडे, शिक्षिका सौ. कल्याणी तुपे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी गावातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अनसिंग पोलिस स्टेशन येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी



**दैनिक युवक आधार**
**गजानन पवार पाटील** : अनसिंग पोलीस स्टेशन येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करते वेळेस उपस्थित पोलीस निरीक्षक अमर चौरे. पोलीस उपनिरीक्षक कविता नागरे. तसेच सर्व पोलीस कर्मचारी उपस्थित होते तसेच बालकिसन नवगणकर दैनिक युवक आधारचे वाशिम जिल्हा प्रतिनिधी गजानन पवार पाटील हे सुद्धा उपस्थित होते.

# लाखनीच्या शिवनगरीत प्रेरणेचा दीप प्रज्वलित ; शिवजयंती नव्या पिढीला देणार स्वाभिमानाचा संदेश

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी भावेश धांधुकिया/भंडारा जिल्हा** : इतिहास केवळ वाचण्यासाठी नसतो, तो जगण्यासाठी असतो. शौर्य, स्वराज्य आणि स्वाभिमानाची अखंड ज्योत चेतवणारे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त लाखनी येथील शिवनगरी ले-आऊटमध्ये दि. १८ ते २० फेब्रुवारी दरम्यान प्रेरणादायी उपक्रमांची मालिकाच उलगडणार आहे.

'शिवबहुउद्देशीय सेवाभावी संस्था'च्या वतीने आयोजित या त्रिदिवसीय सोहळ्यात केवळ उत्सव नाही, तर मूल्यांची जागृती घडविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांसाठी गीतगायन (शिवगीत), वक्तृत्व (शिवचरित्र) आणि शिवनृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धांमधून केवळ गुणांना वाव मिळणार नाही, तर नव्या पिढीच्या मनात स्वराज्य, धैर्य आणि न्यायप्रियतेची बीजे पेरली जाणार आहेत.

दि. १९ फेब्रुवारी रोजी रांगोळी स्पर्धा व शिवपूजनाने दिवसाची सुरुवात होईल. त्यानंतर जि. प. सदस्या विद्या कुंभरे यांच्या अध्यक्षतेखाली आणि डॉ. भूमेश्वरी वाघाये यांच्या उपस्थितीत महिला मेळावा व हळदी-



कुंकू कार्यक्रम पार पडणार आहे.महिलांसाठी उखाणे स्पर्धा व विविध मनोरंजक उपक्रमांमधून स्त्रीशक्तीचा गौरव केला जाणार आहे.शिवनगरी परिसर भगव्या पताकांनी, ऐतिहासिक देखाव्यांनी आणि प्रेरणादायी घोषणांनी सजला असून सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. हा सोहळा केवळ एक सण नसून समाजात ऐक्य, संस्कार आणि राष्ट्रप्रेम जागवणारा एक संस्कारमहोत्सव ठरत आहे.छत्रपती शिवाजी महाराज यांनी दिलेला स्वाभिमान, न्याय आणि लोककल्याणाचा संदेश आजही तितकाच जिवंत आहे. लाखनीतील हा उत्सव त्या आदर्शांना उजाळा देत नव्या पिढीला प्रेरणेचा दीप देणार आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंती निमित्य नागपूर मध्यवर्ती कारागृहात "शिवणेरी" किल्याची सुंदर प्रतिकृती तयार करण्यात आली

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर** : "सुधारणा पुनर्वसन" हे महाराष्ट्र कारागृहाचे ब्रिद असुन कारागृहातील बंदयांच्या कला गुणांना व देण्यासाठी कारागृहात विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात. मा. श्री. सुहास वारके, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. श्री. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंती निमीत्य शिवरायांचे जन्मस्थान "शिवनेरी" किल्याची सुंदर प्रतिकृती तयार करण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी 350 हून अधिक गड-किल्ले जिंकून व बांधून हिंदवी स्वराज्य उभे केले. सदर किल्ले स्वराज्याचे रक्षण, शत्रुवर नजर आणि प्रशासकिय केंद्र म्हणून महत्वाचे होते. या किल्यांनी मराठा साम्राज्याला अभेद्य संरक्षण दिले आणि महाराष्ट्राच्या



इतिहासात आजही शौर्याची साक्ष देत आहेत.

दिनांक 19 फेब्रुवारी 1630 रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म "शिवनेरी" गडावर झाला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेल्या या किल्याला जागतीक वारसा स्थळ म्हणून युनेस्कोचे मानांकन मिळाले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंती निमित्य त्यांचेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कारागृहात उपलब्ध पर्यावरण पुरक (ईको फ्रेंडली) साधन सामुग्री पासुन "शिवनेरी" किल्याची प्रतिकृती कारागृहातील शिक्षा बंदयांनी प्रिंटेड फोटोच्या आधारे व सर्जनशिल कल्पनांद्वारे तयार केली आहे.

यापूर्वी सुध्दा नागपूर येथे खासदार सांस्कृतीक महोत्सव समिती नागपूर यांचेतर्फे "शिववैभव किल्ले स्पर्धा" आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेसाठी नागपूर मध्यवर्ती कारागृहातील शिक्षा बंदयांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवकालीन "रायगड" किल्याची सुंदर प्रतिकृती तयार केली होती. सदर प्रतिकृतीस नागपूर शहरातुन "तृतीय क्रमांक" मिळाला होता व याकरीता मा. श्री. नितिनजी गडगरी साहेब, केंद्रीय मंत्री तथा खासदार नागपूर शहर यांचे हस्ते खासदार सांस्कृतीक महोत्सव समिती, नागपूर यांचेमार्फत सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व रु. 21,000/- धनादेशाद्वारे पारीतोषिक मिळाले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंती निमित्य नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे बंदयांसाठी श्री. प्रविण अविनाश योगी, वरिष्ठ तांत्रिक अधिकारी, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग, नागपूर यांचे शिवचरित्र व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तसेच कारागृहातील बंदयांचे शिवगीते व पोवाडा गीतांचे देखील आयोजन करण्यात आले आहे.

तसेच कारागृह कर्मचारी शासकिय वसाहतीतील कुटुंबातील मुलांचे व महिलांचे विविध स्पर्धा ज्यात चित्रकला स्पर्धा, निबंध लेखन, रांगोळी स्पर्धा यांचा समावेश असुन शिवजयंतीवर आधारीत सांस्कृतीक प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे सदर "शिवनेरी" किल्याची सुंदर प्रतिकृती "श्री. शिवप्रतिष्ठान हिन्दुस्थान नागपूर" या संस्थेचे प्रतिनिधी श्री. रमेश सातपुते, श्री. हर्षल चव्हाण, श्री. अभिजीत पवार, श्री. शुभम पागोडे व श्री. अभिषेख कळमकर यांनी कारागृहातील शिक्षाबंदी अमोल राऊत, सागर बोरकर, सिराज चौधरी, अनिल मडावी, प्रविण दुसराम व पवन डोमकोंडवार यांचे मदतीने तयार केली आहे.

सदर संकल्पना कारागृहात राबविणेसाठी श्री. वैभव सु. आगे, अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह, श्रीमती दिपा वै. आगे, अतिरीक्त अधीक्षक व श्री. आनंद पानसरे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले आहे.

# शृंगऋषी महाराज संस्थानच्या सौंदर्यीकरणासाठी पाच कोटीचा निधी देणार - आ.श्याम खोडे

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील** : पौराणिक व ऐतिहासिक महत्व असलेल्या अनसिंग येथील शृंगऋषी संस्थानच्या सौंदर्यीकरणासह विविध विकास कामासाठी शासनाकडून पाच कोटी रूपयाचा निधी उपलब्ध करून देणार असल्याची माहिती आमदार श्याम खोडे यांनी मंगळवारी येथे दिली.

राजा दशरथाने पुत्रप्राप्तीसाठी जो पुत्रकामेष्ठी यज्ञ केला होता,त्या यज्ञाचे संयोजक अनसिंग येथील श्री शृंगऋषी महाराज होते.अशी अख्यायिका आहे. याचा पुराणातही उल्लेख आहे.अनसिंग येथील शृंगऋषी महाराज मंदिर देशभरात प्रसिद्ध असून दरवर्षी श्रावण महिन्यात आणि महाशिवरात्रीला महाराजांच्या दर्शनासाठी विविध प्रांतातून व पंचक्रोशीतून हजारो भाविक येत असतात.



मंगळवार ( ता.१८ ) रोजी महाशिवरात्रीसोहळ्याच्यामहाप्रसादाच्या कार्यक्रमास वाशीमचे आमदार श्याम खोडे अनसिंग येथील श्री शृंगऋषी महाराज संस्थानमध्ये आले होते.त्यावेळी ते बोलत होते.ते पुढे म्हणाले,शृंगऋषी महाराज मंदिर परिसरातील दोन एकर जागेमध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे,मंदिराच्या बाजुला असलेल्या नाल्यावर अत्याधुनिक स्वच्छता गृह बांधणे,नाल्याचे सौंदर्यीकरण,परिसराचे सौंदर्यीकरण,भक्तांसाठी डोम शेड,महाप्रसादासाठी भव्य शेड,आधुनिक स्वयंपाक घर, सिमेंट काँक्रीटचे रस्ते,रस्त्याच्या दुतर्फा पथदिवे,शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि ईतर आवश्यक कामासाठी आपण शासनाकडून पाच कोटी रूपयाचा निधी मंजूर करून देण्यासाठी पुढाकार घेतला आहे.तसेच श्री शृंगऋषी महाराज मंदिर संस्थानला "ब" वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नरत असल्याचे सांगितले.यावेळी संस्थानचे अध्यक्ष अशोक सारडा, सत्यनारायण सारडा,विश्वस्त अण्णासाहेब राजे,माधव ठाकरे, सारंग सारडा,बबलु बजाज,लक्ष्मण पाबळे,वाशीम बाजार समितीचे संचालक नत्थुजी कापसे,भाजप कार्यकर्ते राजू मानधणे,चंद्रकांत ठाकरे विठ्ठलभाऊ सातव.यांचेसह शेकडो भाविक,भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.शृंगऋषी संस्थानच्या वतीने आमदार खोडे यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला.आमदार खोडे यांनी महाप्रसादाच्या पंगतीमध्ये भाविकांना महाप्रसादाचे वितरण करून आपली सर्वसामान्य लोकांसोबत बांधिलकी असल्याचे दर्शविले.

# सिम्बॉल ऑफ नॉलेज एज्युकेशन, आष्टी येथे शिवजयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**हदगाव | प्रतिनिधी/विश्वदीप कांबळे** : आष्टी येथील या शैक्षणिक संस्थेत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे संचालक शंकर डोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठित व्यक्ती श्री. दिनेश पाटील आष्टीकर व श्री. पवन पाटील आष्टीकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच पालकवर्ग, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. प्रमुख पाहुणे श्री. दिनेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना




मार्गदर्शन करताना शिवरायांच्या शौर्य, धैर्य व आदर्श नेतृत्वगुणांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल जागरूकता निर्माण होऊन देशभक्तीची भावना दृढ झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संस्थेच्या शिक्षकांनी केले.

# सिम्बॉल ऑफ नॉलेज एज्युकेशन, आष्टी येथे शिवजयंती उत्साहात साजरी



**दैनिक युवक आधार**

**हदगाव | प्रतिनिधी/विश्वदीप कांबळे** : आष्टी येथील या शैक्षणिक संस्थेत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे संचालक शंकर डोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.या कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठित व्यक्ती श्री. दिनेश पाटील आष्टीकर व श्री. पवन पाटील आष्टीकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच पालकवर्ग, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. प्रमुख पाहुणे श्री. दिनेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिवरायांच्या शौर्य, धैर्य व आदर्श नेतृत्वगुणांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल जागरूकता निर्माण होऊन देशभक्तीची भावना दृढ झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संस्थेच्या शिक्षकांनी केले.

# शिवडीत महाविद्यायीन युवकावर बिबट्याचा हल्ला

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/ राहुल कुलकर्णी** : निफाड तालुक्यातील शिवडी येथील जिल्हा परिषद वस्तीशाळेवर बिबट्याचे दर्शन झाल्याची घटना ताजी असतांना बुधवारी सकाळी ९ वा सुमारास जवळच असलेल्या वाबळे वस्तीवरील प्रितम प्रविण वाबळे या युवकावर बिबट्याने हल्ला केल्याची घटना घडली आहे. शिवडी शिवारातील चारी क्र १४ लगत असलेल्या वाबळे वस्तीवर बुधवारी सकाळी ९ वा सुमारास प्रितम प्रविण वाबळे हा सतरा वर्षीय युवक शेतातील शेडलगत काम करत असतांना पाठीमागुन बिबट्याने अचानक हल्ला करुन डाव्या बाजुचे मांडीला चावा घेतला जवळच शेतात



काम करत असलेले संजय वाबळे, गोरखनाथ शिंदे यांनी तात्काळ धाव घेत प्रितम याची बिबट्याचे तावडीतुन सुटका केली. स्थानिक नागरीक जमा झाल्याने बिबट्या लगतच गव्हाच्या शेतात पळाला जखमी अवस्थेत प्रितम वाबळे यास उगांव येथे प्राथमिक उपचार करुन अधिक उपचारासाठी निफाड येथील उपजिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले उपचारानंतर प्रितम यास घरी सोडण्यात आले आहे दरम्यान घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे विजय धोंडे व सहकारी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली तसेच जिल्हा परिषद शिंदे वस्तीशाळेजवळ पिंजरा लावण्यात आला यावेळी माजी उपसरपंच संजय शिंदे ,रोशन शिंदे ,अशोक वाबळे ,प्रविण वाबळे, महेश शिंदे ,रामदास शिंदे ,तेजस शिंदे, अमोल दरेकर ,राजेंद्र वाबळे,नानासाहेब शिंदे, शिवाजी शिंदे, ज्ञानेश्वर सानप आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

**विद्यार्थी व पालक मात्र दहशतीखाली**

शिवडी भागात गेल्या दिड दोन महिन्यापासुन बिबट्याचा वावर आहे मात्र अद्याप पर्यंत बिबट्याने केवळ मेंढ्या शेळ्या कुत्रे अशा प्राण्यांना लक्ष केले होते बुधवारी मात्र थेट युवकावर बिबट्याचा हल्ला झाल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये भितीचे वातावरण आहे

# सापळी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील** : सापळे येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती दरम्यान उपस्थित सर्व गावकरी मंडळी तसेच तरुण मंडळी यांच्या सहभागाने गावात महाप्रसादाचे आयोजन तसेच विविध कार्यक्रमाचे आयोजन करून गावात भव्य मिरवणूक काढून मोठ्या उत्सवात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली त्यामध्ये आयोजक मंडळी..मंगेश चव्हाण



रामदास चव्हाण, उमेश सुरूषे सर ,भागवत ढगे सर,आचारी तुकाराम ढगे.मुरली ढगे शंकर चव्हाण राजू ढगे,रतन ढगे भी वबा ढगे,देवानंद ढगे कूडलिक चव्हाण सारंग ढगे, ज्ञानू माऊली वेल्डिंग ढगे, एकनाथ चव्हाण एकनाथ ढगे,गजानन सुरुषे कडू मामा तसेच पत्रकार गजानन पवार पाटील हे सुद्धा उपस्थित होते.

# गोंदिया : स्वर्गीय झुलनबाई बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने शिवजयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड/प्रतिनिधी गोंदिया जिल्हा** : स्थानिक स्व. झुलनबाई बहुउद्देशीय संस्था अंतर्गत संचालित सतनाम नशा मुक्ती केंद्र, गोंदिया येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष सचिन बन्सोड सर , सचिव टी.वाय. चिर्वतकर, सदस्य सौ.सुनिता सव्वालाखे मॅडम ,इतर कर्मचारी वृंद आणि केंद्रातील लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता.

मान्यवरांचे मार्गदर्शन

कार्यक्रमात बोलतानी संस्थेच्या




पदाधिकाऱ्यांनी शिवरायांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. "छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक राजे नव्हते, तर ते एक उत्तम व्यवस्थापक आणि शिस्तप्रिय नेतृत्व होते. तरुणांनी त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन व्यसनांपासून दूर राहावे आणि राष्ट्राच्या उभारणीत योगदान द्यावे," असे आवाहन यावेळी करण्यात आले

# एल आय सी १०० रुपये रोज बचत योजनेची घोषणा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : जग जसे वेगाने बदलत आहे तसेच एल आय सी ने पण बदलत कात टाकली असून सामान्य ग्राहकाला अजून मोठ्या प्रमाणात जोडता येण्यासाठी रोज १०० रुपये बचत योजना जनजागृती मोहीम सुरू केली आहे.या निधीत गुंतवणूक करण्यासाठी दैनंदिन गुंतवणूक रु. १००, मासिक गुंतवणूक रु. २०० आणि तिमाही गुंतवणूक रु. १,००० ने करता येईल. किमान रक्कम रु. १,००० आहे. हा निधी कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा केंद्र, डिजिटल व्यासपीठ आणि इतर तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये पैसे गुंतवण्यासाठी तयार करण्यात आला आहे. याची सुरुवात २० फेब्रुवारी २०२६ रोजी होईल आणि ६ मार्च २०२६ रोजी संपेल. नंतर लोक या निधीत



पैसे जमा किंवा काढू शकतात. व्यवस्थापक कारण दोशी आणि जयप्रकाश तोष्णीवाल आहेत.मुख्य कार्यकारी अधिकारी आर.के. झा म्हणाले की सरकारने सेमीकंडक्टर आणि डिजिटल तंत्रज्ञान क्षेत्रात मोठा गुंतवणूकचा संकल्प केला आहे. मुख्य गुंतवणूक अधिकारी योगेश पाटील म्हणाले की या निधीत अशा कंपन्यांमध्ये पैसे गुंतवले जातील ज्या सतत वाढत राहतात, चांगला नफा करतात.

# दप्तर नव्हे, शिक्षक द्या! भंडाऱ्यात शाळा बंदीविरोधात विद्यार्थ्यांचा निर्णायक एल्गार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले/लाखनी, भंडारा** : कमी पटसंख्येच्या नावाखाली राज्यातील मराठी शाळा बंद करण्याच्या निर्णयाविरोधात भंडाऱ्यात तीव्र जनआक्रोश पाहायला मिळाला. ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन (AISF) यांच्या नेतृत्वाखाली शेकडो विद्यार्थी व पालकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढत शासनाच्या शिक्षणधोरणाचा निषेध केला.



हुतात्मा स्मारक, शास्त्री चौक येथून निघालेल्या मोर्चात "आम्हाला दप्तर नको, शिक्षक पाहिजे", "शिक्षण आमचा हक्क आहे", "शाळा बंदीचा निर्णय रद्द करा" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. मोर्चात मोठ्या संख्येने चिमुकले विद्यार्थी सहभागी झाले होते. काही बालकांनी महामानवांची वेशभूषा परिधान करून शिक्षणाचे सामाजिक महत्त्व अधोरेखित केले.भंडारा जिल्ह्यातील तब्बल १५५ प्राथमिक शाळा बंद होण्याच्या मार्गावर असल्याने ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अंधारात जात असल्याची तीव्र भावना आंदोलनात व्यक्त झाली. "शिक्षण हक्क कायद्याची पायमल्ली करून शाळा बंद करणे म्हणजे विद्यार्थ्यांच्या भविष्यावर घाला आहे," असा आरोप आंदोलकांनी केला

# श्रीवर्धनमध्ये कायमस्वरूपी रोजगार निर्मितीची गरज; पावसाळ्यात अर्थचक्र होते ठप्प

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/ अनिकेत मोहित** : श्रीवर्धन तालुक्यात दरवर्षी पावसाळा सुरू झाला की स्थानिक अर्थचक्र अक्षरशः थांबते. पर्यटन हा मुख्य व्यवसाय असल्याने समुद्रकिनारे, रिसॉर्ट, हॉटेल, होमस्टे, बोटिंग यांसारख्या उपक्रमांवर मोठ्या प्रमाणात परिणाम होतो. मुसळधार पावसामुळे पर्यटकांची संख्या घटते आणि अनेक व्यावसायिकांना व्यवसाय बंद ठेवावा लागतो.

याचबरोबर मत्स्य व्यवसायावरही पावसाळ्यात निर्बंध येतात. मासेमारी बंद हंगामामुळे मच्छीमार बांधवांना उत्पन्नाचे साधन राहत नाही. परिणामी, स्थानिक तरुण व कामगार वर्गासाठी रोजगाराच्या संधी अत्यंत मर्यादित होतात. अनेक कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो.स्थानिक नागरिकांच्या मते, केवळ हंगामी पर्यटनावर अवलंबून राहणे ही मोठी जोखीम आहे. त्यामुळे प्रशासन व लोकप्रतिनिधींनी तातडीने पर्यायी उद्योग, लघुउद्योग व कौशल्याधारित प्रकल्प उभारण्यावर भर देणे गरजेचे आहे. मत्स्यप्रक्रिया उद्योग, कोकणातील फळांवर आधारित प्रक्रिया उद्योग, हस्तकला, घरगुती उद्योग, तसेच ऑनलाईन सेवा केंद्रे यांसारख्या संधी विकसित केल्यास वर्षभर रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

तज्ज्ञांच्या मते, पावसाळ्यात चालू राहतील असे प्रशिक्षण कार्यक्रम, स्वयंरोजगार योजना आणि शासनाच्या विविध योजनांचा प्रभावी वापर केल्यास परिस्थितीत बदल घडवून आणता येऊ शकतो. स्थानिक स्वराज्य संस्था, व्यापारी संघटना आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्र येऊन दीर्घकालीन रोजगार आराखडा तयार करणे ही काळाची गरज आहे. श्रीवर्धनच्या आर्थिक स्थैर्यासाठी तात्पुरत्या उपाययोजना नव्हे, तर कायमस्वरूपी रोजगार निर्मितीचा ठोस रोडमॅप आवश्यक आहे.

पावसाळा म्हणजे बेरोजगारीचे दिवस अशी स्थिती बदलण्यासाठी आतापासूनच नियोजन व कृती होणे अत्यावश्यक आहे.

# वैनतैय'च्या चिमुकल्यांनी साकारले शिवरायांचे गड-किल्ले शिवरायांच्या स्मृती जपण्याचा प्रेरणादायी उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : महाराष्ट्राला गड किल्ल्यांचा मोठा वारसा लाभलेला आहे. शिवजयंती निमित्ताने अवघे वातावरण भगवेमय होत आहे. निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर शाळेतील विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक वारसा जपत विविध गड-किल्ल्यांच्या प्रतिकृती साकारल्या. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या गड-किल्ल्यांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन न्या. रानडे विद्याप्रसारक संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, विश्वस्थ मधुकर राऊत, ॲड. दिलीप वाघावकर, मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे आदि मान्यवरांच्या हस्ते झाले. शिक्षक गोरख सानप यांच्या मार्गदर्शना खाली द्राक्षांचे तसेच ड्रेसचे रिकामे खोके, जुन्या वह्यांचे पुठ्ठे या टाकाऊवस्तूंचा वापर करून गड-किल्ले तयार करण्याच्या कार्यशाळेत १३३ प्रतिकृती तयार करण्यात आल्या, यासह सानप यांनी चौथीच्या अभ्यासक्रमावर आधारीत साकारलेल्या द्विमिती चित्र प्रकारातील शिवसृष्टीचे वैनतेय प्राथमिक, माध्यमिक,व इंग्रजी माध्यमेतील विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी लाभ घेतला. जलदुर्ग,




**निफाड : वैनतेय प्राथमिक विद्यामंदिरातील विद्यार्थ्यांनी तयार केलेले गड-किल्ले समवेत संस्थेचे अध्यक्ष वि. दा. व्यवहारे,मधुकर राऊत, प्राचार्य मनिषा गुजराथी, सुभाष खाटेकर, बा.बा. गुंजाळ, मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे, निलेश शिंदे, शिक्षक गोरख सानप, किरण खैरनार.**

गिरीदुर्ग, भुईदुर्ग यांसह किल्ल्यांच्या माहितीचे सादरीकरण याप्रसंगी विद्यार्थ्यांनी केले. शिवरायांचा जन्म, त्यांचे बालपण, शिक्षण, स्वराज्याचे तोरण, प्रतापगडावरील पराक्रम, घोडखिंडीतील पराक्रम, शायिस्तेखानाची फजिती, आग्र्याहून सुटका, राज्याभिषेक यांसारख्या विविध चित्र प्रसंगातून विद्यार्थ्यांना स्फूर्ती व प्रेरणा मिळाली. या प्रदर्शनास जि.प. निफाड शाळेचे मुख्याध्यापक निलेश शिंदे, महाजन, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त विजेते शिक्षक सुरेश धारराव, विजय शिंदे, कुमार जंगम, यासह अनेक शिक्षकांनी भेट दिली छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा वारसा प्रत्यक्ष कृतीतून रूजविण्यासाठी राबविलेल्या उपक्रमाचे न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ निफाड संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, सचिव रतन वडघुले, विश्वस्त राजेद्र राठी, किरण कापसे,राजेश सोनी, ॲड. दिलीप वाघावकर, विश्वास कराड, मधुकर राऊत, नरेंद्र नांदे, प्रभाकर कुयटे, निफाड चे गटशिक्षणाधिकारी विलास साळी विस्तार अधिकारी लता भरसट, कैलास बोरसे, वसंत गायकवाड, केंद्रप्रमुख अनिता अहिरे, शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे व पालकांनी कौतुक केले.

**" गड-किल्ले केवळ पर्यटन स्थळे नसून ती महाराष्ट्राच्या इतिहासाची जिवंत स्मारके आहेत. प्रत्यक्ष कृतीतून ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी चिमुकल्यांनी राबविलेला उपक्रम कौतुकास्पद आहे."**

**-वि. दा. व्यवहारे, अध्यक्ष न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ, निफाड**

**छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास शिकतांना त्यांचे किल्ले तयार करतांना किल्ल्यांचे प्रकार, बालेकिल्ला, बुरूज, तटबंदी, राजवाडा, नगारखाना,माची, महादरवाजा यांसारख्या गोष्टीची माहिती मिळाली. स्वत: किल्ला तयार करताना आम्हा मुलांना खूप आनंद आला."**

**वेदिका गारे ,विद्यार्थीनी, वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर , निफाड**

# अल्पसंख्यांक युवकांसाठी रोजगाराची सुवर्णसंधी! कारंजा लाड रोजगार मेळाव्यात ९० उमेदवारांची थेट प्राथमिक निवड

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : अल्पसंख्यांक समाजातील युवक-युवतींना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कारंजा लाड येथे आयोजित विशेष रोजगार मेळाव्याला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने आयोजित या मेळाव्यात तब्बल २०९ उमेदवारांनी सहभाग नोंदवत रोजगारासाठी मोठी उत्सुकता दर्शविली.या मेळाव्यात सहभागी झालेल्या उमेदवारांपैकी ९० उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली असून सुमारे ४३ टक्के उमेदवारांना तात्काळ रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. ही बाब अल्पसंख्यांक युवकांसाठी मोठी दिलासादायक आणि प्रेरणादायी ठरली आहे. विशेष म्हणजे, या मेळाव्यात ४६ मुलींचा उल्लेखनीय सहभाग नोंदविला गेला, ज्यामुळे महिलांचे रोजगार क्षेत्रातील वाढते योगदान अधोरेखित झाले.मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांच्या कौशल्याची पाहणी करत त्यांच्या गुणवत्तेचे कौतुक केले. तसेच भविष्यात अशा रोजगार मेळाव्यांमध्ये अधिकाधिक सहभाग नोंदविण्याची तयारीही कंपन्यांनी दर्शविली. यामुळे स्थानिक स्तरावर रोजगार निर्मितीला चालना मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.स्थानिक युवक-युवतींना त्यांच्या परिसरातच रोजगार उपलब्ध

अल्पसंख्याक विकास विभाग
महाराष्ट्र शासन

करून देणे, त्यांच्या कौशल्य विकासाला गती देणे आणि आर्थिक सक्षमीकरण साधणे हा या रोजगार मेळाव्याचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.यावेळी सहाय्यक आयुक्त प्रवीण खंडारे यांनी प्राथमिक निवड झालेल्या उमेदवारांचे अभिनंदन करत, निवड न झालेल्या उमेदवारांनी निराश न होता आगामी रोजगार मेळाव्यांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. तसेच युवकांनी स्वतःचे कौशल्य विकसित करून रोजगाराच्या संधींचा लाभ घ्यावा, असे मार्गदर्शनही त्यांनी केले.या रोजगार मेळाव्यामुळे अल्पसंख्यांक युवक-युवतींसाठी रोजगाराचे नवे दरवाजे खुले झाले असून, स्थानिक स्तरावर रोजगार निर्मितीच्या दिशेने हे एक महत्त्वाचे आणि सकारात्मक पाऊल मानले जात आहे.

# निफाडमध्ये भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांचा बंडाचा इशारा ; २ मार्चपासून बेमुदत कामबंद

**दैनिक युवक आधार**
**राजेश भडांगे निफाड/तालुका प्रतिनिधी** : निफाड येथे भूमी अभिलेख कर्मचारी कृती समितीच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी असहकार आंदोलन छेडण्यात आले असून, मागण्या मान्य न झाल्यास २ मार्चपासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येणार असल्याचा ठाम इशारा देण्यात आला आहे.

आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात कर्मचाऱ्यांनी मोजणी साहित्य जमा करून कार्यालयीन कामकाज काळ्या फिती लावून सुरू ठेवले आहे.

२३ ते २६ दरम्यान सामूहिक रजा आंदोलन करण्यात येणार असून, २७ रोजी जमाबंदी आयुक्त (पुणे) कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्याची घोषणा करण्यात आली आहे.



तांत्रिक वेतनश्रेणी लागू करणे, सुधारित आकृतीबंध तयार करणे, मोजणी कर्मचाऱ्यांना निश्चित प्रवास भत्ता देणे, खासगीकरणाचा निर्णय रद्द करणे, तसेच व्हर्जन 2 सॉफ्टवेअर सुटसुटीत करणे आदी मागण्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.मागण्या तातडीने मान्य न झाल्यास भूमी अभिलेख विभागाचे कामकाज ठप्प करण्याचा इशारा देत आंदोलन अधिक तीव्र करण्याची भूमिका कर्मचाऱ्यांनी स्पष्ट केली आहे.

# सामूहिक कॉपी प्रकरणानंतर किती कर्मचाऱ्यांवर निलंबन कारवाई? अमरावती विभागात सर्वाधिक गैरप्रकारांची नोंद

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) सुरू असलेल्या बारावीच्या परीक्षेत आतापर्यंत सहा सामूहिक कॉपी प्रकरणांची नोंद झाली आहे. या प्रकरणी गुन्हे दाखल करून ३१ जणांना निलंबित करण्यात आले आहे. त्यात वाढ होण्याची शक्यता आहे.

राज्यात बारावीची परीक्षा तीन हजार ३८७ मुख्य परीक्षा केंद्रांवर घेण्यात येत आहे. यातील जवळपास ९५ टक्के परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही आहेत. तर, सीसीटीव्ही नसलेल्या १७२ परीक्षा केंद्रांवरील कर्मचाऱ्यांची अदलाबदली केली आहे. बारावीच्या परीक्षेत कॉपी, गैरप्रकार रोखण्यासाठी राज्य मंडळाने विविध उपाययोजना केल्या आहेत. आतापर्यंत १०९ गैरप्रकारांची नोंद झाली आहे. त्यात छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळांतर्गत पाच, तर अमरावती विभागीय मंडळांतर्गत एका परीक्षा केंद्रावर सामूहिक कॉपी प्रकरण उघडकीस आले आहे.

सामूहिक कॉपी प्रकरणातील सहभागी कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारून निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळांतर्गत बीड जिल्ह्यातील चौसाळा येथील कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील प्रकरणात ७, कन्नड तालुक्यातील जैतापूर येथील राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालय येथील प्रकरणात १८ कर्मचारी, जालना जिल्ह्यातील रोहिलागड येथील जांबुवंत उच्च माध्यमिक विद्यालय, शहागड येथील प्रबोधनकार ठाकरे उच्च माध्यमिक विद्यालय, अंकुशनगर येथील छत्रपती शिवाजीनगर उच्च माध्यमिक विद्यालय येथील प्रकरणात सहा जणांना निलंबित करण्यात आले आहे. तर, अमरावती विभागीय मंडळांतर्गत वाशिम जिल्ह्यातील श्री मैनागिरी महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील प्रकरणात २६ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती राज्य मंडळाचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी दिली.

**सर्वाधिक गैरप्रकार अमरावती मंडळांतर्गत**

आतापर्यंत उघडकीस आलेल्या १०९ गैरप्रकारांमध्ये सर्वाधिक ५० गैरप्रकार अमरावती विभागीय मंडळांतर्गत नोंदवण्यात आले आहेत. त्या खालोखाल पुणे येथे २७, नागपूर आणि लातूर येथे ११, छत्रपती संभाजीनगर येथे सहा, तर नाशिक येथे चार गैरप्रकार उघडकीस आले आहेत. कोकण, मुंबई आणि कोल्हापूर विभागीय मंडळात आतापर्यंत एकाही गैरप्रकाराची नोंद झालेली नाही.

# एका 'प्रेमळ पर्वाचा' अंत ;आय ई . एस जे एन पी व्ही च्या माजी मुख्याध्यापिका स्व .सुषमा कोल्हे मॅडम यांचे हृदयविकाराने निधन!

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी :** आपल्या शांत, संयमी आणि मातृवत स्वभावाने हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणाऱ्या, आय ई एस जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका श्रीमती सुषमा प्रभाकर कोल्हे वय वर्ष ६४ वर्ष यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या जाण्याने उरण शैक्षणिक क्षेत्रात आणि त्यांच्या असंख्य विद्यार्थ्यांमध्ये कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

मुळच्या जळगाव जिल्ह्यातील हिंगोली गावच्या सुकन्या असलेल्या सुषमा मॅडम लहानपणापासूनच अभ्यासात अत्यंत हुशार इंग्रजी विषयाची त्यांना विशेष ओढ होती, ज्यातून त्यांनी बीएड आणि एम एड पर्यंत उच्च शिक्षण पूर्ण केले. विवाहनंतर श्री प्रभाकर कोल्हे यांच्या नोकरीनिमित्त त्या उरणमध्ये स्थायिक झाल्या आणि इथल्या मातीशी त्यांचे अतूट नाते जडले.

१९९०मध्ये त्यांनी आय ई एस जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयात सहाय्यक शिक्षिका म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यांच्यानंतर



BHAVPURNA SHRADHANJALI / भावपूर्ण श्रद्धांजलि
25TH AUG 1963 - 14TH FEB 2026

त्यांच्यातील शिस्त आणि कामाप्रती असलेली निष्ठा पाहून २००४ मध्ये त्यांच्याकडे मुख्याध्यापक पदाची धुरा सोपवण्यात आली.२००४ ते २०२१सलग १७ वर्षाच्या कार्यकाळात त्यांनी शाळेला एका नव्या उंचीवर नेऊन ठेवले.

सुषमा मॅडम केवळ मुख्याध्यापिका नव्हत्या तर, त्या संपूर्ण शालेय कर्मचाऱ्यांसाठी एक भक्कम आधारवड होत्या. सहकार्यांना कामात सांभाळून घेण्याची वृत्ती आणि सर्वांशी प्रेमाने व सलोख्याने वागण्याच्या त्यांच्या गुणामुळे त्या सर्वांच्या प्रेरणास्थानी होत्या .एक कडक शिस्तीचा चेहरा पण त्यामागे असणारी मायेचे हृदय अशी त्यांची ओळख होती.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिकलेले अनेक विद्यार्थी आज देश विदेशात मोठ्या पदांवर कार्यरत आहेत केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर आयुष्यात चांगले माणूस कसे बनावे याचे संस्कार त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना दिले. आजही त्यांच्या विद्यार्थ्यांच्या लाडक्या 'कोल्हे मॅडम' म्हणून त्यांची आठवण काढताना भाऊक होतात. त्यांच्या निधनाची बातमी समजतात जे एन पी टी परिसरात आणि शैक्षणिक वर्तुळात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पक्षात पती, दोन मुले आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे .जेएनपीए विद्यालयाच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आहे. आयुष्याच्या परीक्षेचा पेपर इतक्या लवकर सोडून मॅडम निघून जातील असे कोणालाही वाटले नव्हते त्यांच्या जाण्याने आज केवळ कोल्हे परिवारच नाही तर आईएएस परिवारातील प्रत्येक सदस्य शोकाकुल आहे. एक आदर्श शिक्षिका ,उत्तम प्रशासक आणि सर्वांना हवे हवे असे वाटणारे व्यक्तिमत्व आज आनंदात विलीन झाले असले तरी त्यांनी दिलेली शिकवण पिढ्याला पिढ्या जिवंत राहील.

मॅडम तुम्ही वर्गात नसाल शाळेच्या खुर्चीवर नसाल पण जेव्हा जेव्हा शाळेचा विद्यार्थी आयुष्यात यशस्वी होईल तेव्हा त्याच्या याच्या तुमच्या संस्कारांचा सुगंध नक्कीच दरवळेल.

# जय शिवाजी जय भारत पदयात्रेने दणाणले वाशिम शहर

## जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा

**दैनिक युवक आधार**
**रिसोड. प्रतिनिधी/ रणजितसिहं ठाकूर :** "मेरा युवा भारत केंद्र, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित" मेरा युवा भारत केंद्र, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जय शिवाजी जय भारत' च्या घोषणांनी शहराचा परिसर दुमदुमून सोडत देशभक्ती, सामाजिक ऐक्य आणि प्रेरणादायी संदेश देणारी भव्य पदयात्रा उत्साहात पार पडली. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून पदयात्रेला प्रारंभ करण्यात आला.

विद्यार्थ्यांचा उत्साह, आकर्षक वेशभूषा आणि शिस्तबद्ध संचलनामुळे नागरिकांचे विशेष लक्ष वेधले गेले.कार्यक्रमाला नगराध्यक्ष अनिल केंदळे, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, तहसीलदार निलेश पळसकर,




मुख्याधिकारी निलेश गायकवाड, जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे, एनसीसी अधिकारी अमोल काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत देशभक्तीची भावना जपण्याचे आवाहन केले.पदयात्रेचे विशेष आकर्षण ठरले छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशभूषेमध्ये स्वप्निल केळे राजमता जिजाऊ यांच्या आकर्षक वेशभूषेमध्ये जिल्हा युवा पुरस्कारार्थी कु.आकांक्षा गायकवाड आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित गीत व पथनाट्य. आणि वैष्णवी पानझाडे यांनी सादर केलेली शिव गर्जना या सादरीकरणातून स्वराज्य, शौर्य आणि राष्ट्रनिष्ठेचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला. उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांना दाद दिली.

या पदयात्रेत राष्ट्रीय छत्र सेनेचे विद्यार्थी, नेहरू युवा मंडळ केकतउमरा, गुणवंत मागासवर्गीय मुलांचे शासकीय वस्तीगृहातील विद्यार्थी, स्काऊट गाईड्स तसेच मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींच्या शासकीय वस्तीगृहातील विद्यार्थिनी राजा प्रसेनजित संस्था प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. हातात देशभक्तीपर फलक, घोषवाक्ये आणि पारंपरिक वेशभूषेमुळे पदयात्रेला विशेष रंगत आली.

सुरुवातीला जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शिवाजी चौक येथून पदयात्रेला प्रारंभ झाला. प्रमुख मार्गावर नागरिकांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करत देशभक्तीपर घोषणांमध्ये सहभाग नोंदविला.

अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने कार्यक्रमाला व्यापक प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाचे संचालन जिल्हा युवा पुरस्कारार्थी प्रदीप पट्टेबहादूर यांनी केले. एकूणच, 'जय शिवाजी जय भारत' पदयात्रेच्या माध्यमातून देशप्रेम, सामाजिक सलोखा आणि ऐतिहासिक वारशाचा अभिमान यांचा प्रभावी संदेश वाशिमकरांपर्यंत पोहोचला. यशस्वीतेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,नेहरू युवा मंडळ केकतउमरा, मेरा युवा भारत केंद्र स्वयंसेवक यांनी पुढाकार घेतला.

# मध्योत्तर भारताचा "नवनाग" शौर्य पराक्रम

दि. १५ अक्टूबर १९५६, दीक्षाभूमि नागपुरला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण गाजलेले आहे. त्यांनी संकेत दिला होता कि आमचे पूर्वज नागवंशी राजकर्त्या जमातीचे होते. म्हणूनच आम्हाला बहिष्कृतीचा परिणाम भोगावा लागला. आम्हाला भारताचा गडपलेला नागवंशी इतिहास शोधावा लागेल आणि हि आमची कर्मबद्ध जवाबदेही आहे. त्याच अनुसंघानीशी आम्ही ई.पू. प्रथम शताब्दीच्या नागवंशी शौर्यवर्धक राजांचा इतिहास शोधून काढला आहे. ई.पू. प्रथम शताब्दी, पूर्वीपथाचे गाजलेले नाव खारबेला, (खार = पिकाऊ क्षेत्र), बेला = नागाची वेल किंवा पारिवारिक पिढ्यांची शृंखला, आणि त्यांचा आदि राजपुरुष नागोवाहन मौर्यकाळात पूर्वीपथाचे सेनापती होते. त्यांचा इतिहास हाथीगुफा शिलालेखात उत्कीर्ण आहे. हाथी = गज = नाग (पाली भाषा). गुफा = लेणी. बौद्ध संस्कृती ची निर्मित कलाकृती विश्व विख्यात आहे. खारबेला शिलालेखात लिहतो सुकत समन अर्हतांच्या थुपाला हाथी, घोडे व रथ यात्रा घेऊन शरण जातो. कलिंगचा आदि राजा केतूभद्दा ची प्रतिमा स्थापित करतो. केतुभद्द बुद्धाचा कट्टर उपासक होता. खारबेलाचा काळ ई.पू. ११५ ते ई.पू. ७८ होता.

पश्चिमापथावर गाजलेले नाव गजभिल्ल पुत्र विक्रमादित्य (विक्रमसेन) ई.पू. १०१ ला जंगली नाग कबिल्यात बालपण घालवतो. तिथे तो माता सौम्यदर्शना व सेनापती काळनागच्या सहवासात शस्त्र युद्धकलेत पारंगत, घोडसवारी व गजसवारी यात प्रवीण होतो. पिता गंधर्वसेन (गजभिल्ल)चा मृत्युचा बदला शक छत्रप माउस शी घेतो आणि त्याचा पाठलाग करत यूनान व रोम कडे जाऊन गुरुर मैदान जिंकून जुलियस सिजर ला कैद करून आणतो. त्याला निर्वस्त्र करून गाढवावर बसवून उज्जैनच्या गलीत धिंड काढतो. पाठोपाठ मालवावर शासित शक छत्रप सोसाक, मथुरावर शासित शक छत्रप थोरात पुत्र यांना हाकून लावतो. विक्रमसेन व सेनापती कालभैरव नागाची भैरव सेना व त्यांची कटिबद्ध शिस्तता पाहून युनानी, ग्रीक व रोम चे छत्रप आपला जीव घेऊन पळाले होते. विक्रमसेनानी ई.पू. ५६ ला आपला राज्यभिषेक करून विक्रम संवत कालपत्रक जाहीर केले होते. त्याच वेळी त्याला विक्रमादित्याची उपाधि देण्यात आली. त्याच्या दरबारी खगोल शास्त्री, भूगोल शास्त्री, भूमीतज्ञ, गणितज्ञ, भौतिक शास्त्री, रसायन शास्त्री व व्याकरणज्ञ, धातुशास्त्री असे नवरत्न मंडळ होते. विक्रमादित्याला दक्षिणपथाचे शालिवाहन राजा सिमुकचा अनुज बंधू "अपीलक" ची सैन्य शस्त्रबळ सहायता व आर्थिक मदती करीता कोषाकार "अमरगुप्त" त्यांच्या दरबारी होता. हि माहिती अरबी इतिहासकार साईहुल हकुल नी "जराहीम कितोई" मध्ये लिहली आहे आणि ज्योतिर्विद्यापर्ण या ग्रंथात नमूद आहे.

ई.पू. १८७ मध्ये दगाबाज अमात्य पुष्पमित्र शुंग ने सैन्य परेड करीत मौर्य सम्राट वृहद्रथ ची हत्या करून सत्ता सूत्र स्वतःच्या हाती घेतले. परंतु हे कपट कारस्थान मौर्य सत्ता अधीन नवनाग बौद्ध राजांना खपले नाही आणि मगध राज्यात विद्रोह आरंभ झाला. हा विद्रोह कुचाळण्या करीता पुष्पमित्र शुंगानी आदेश दिला कि एका बौद्धांचा गळा कापून आणणाऱ्याला सौ कार्ष्यापन (स्वर्ण मुद्रा) पुरस्कार दिला जाईल. अशा परिस्थितीत सर्व बौद्ध नागराजे व प्रजा जंगलात पळून गेले. त्यात मध्य भारत, जबलपूर (बघेल खंड), विदिशा, कोशाम्बी, अहिछत्र, पांचाल, रामनगर, पद्मावतीच्या घनदाट जंगली क्षेत्रात लुप्त झाले. ३७ वर्षानंतर युनानी आक्रमणकारी भारतात शिरले, त्यात ग्रीक सम्राट मिलिंद होता. त्याला रोकण्या करीता पुष्पमित्र शुंगाने आपला नातू "वसुमित्रा" ला सैन्यबळ देऊन सिंध प्रांताकडे पाठवीले. या घनघोर युद्धात वसुमित्र मारला गेला आणि सम्राट मिलिंद विजयी झाला. त्याची मैत्री नागसेन महास्थवीराशी झाली. अशा परिस्थितीत मध्य भारताच्या जंगली प्रदेशात लुप्त झालेले नागवंशी बौद्ध राजे पुन्हा गंगा नदीच्या सुपीक मैदानावर वसाहती बसवून स्थापित झाले. त्यांना इतिहासकार नवनाग लिहितात. नवनाग आर्थत नवीन नागवंश, जसे आज चे नवबौद्ध, अर्थात पूर्ववत नागवंशी बौद्ध प्राचीन इतिहासात गाजलेले होते.

ई.पू. प्रथम शताब्दीत असद सेन ची पाभोशात दोन गुफा शिलालेख प्राप्त झाले. ते कोसांबी संग्रहालयात सुरक्षित आहे. एका शिलालेखात अहिछत्रचा नागराजा असद सेन काश्यपीय अर्हताला ह्या दोन गुफा दान करतो. दुसऱ्या शिलालेखात मगधाचा नागराजा वृहस्पती मित्र असद सेनचा भाचा उत्कीर्ण आहे. त्यात नागराजांच्या पूर्वी चार पिढ्यांचे नाव उत्कीर्ण आहे. त्यांचा आरंभ सोनाकायन मधून होतो. कोसांबी पुरा. उत्खननात प्राप्त झालेले दोन शिक्के (नाणे) यावर वृहस्पती मित्राचे नाव उत्कीर्ण आहे. कोसांबी, अहिछत्र, पांचाल, पद्मावती, मथुरा, कशी, रामनगर, विदिशा, कांतिपुरी व एरणच्या पुरा. उत्खननात प्राप्त झालेले शिक्के (नाणे) चे संशोधन करून पुरावेत्ता/इतिहासकार के.पी. जयस्वाल लिहतात, या नवनाग राजांनी शक छत्रपांना बाहेर हाकलून प्रथम शताब्दीत स्वतःची आपली स्वतंत्र सत्ता स्थापित केली होती. यांच्या शिक्यांवर गज (हाथी), नाग, सिंह, वृषभ (बैल) उत्कीर्ण दिसतात आणि समय अंतराळ समय कालगणना प्रमाण सिद्ध होतो.

१) *पद्मावती* क्षेत्र (ग्वालियर/ डबरा) ई.पू. ११०- गणपतिनाग, विभूतीनाग, रविनाग, भवनाग, वसुनाग, प्रभुनाग व देवनाग २) *मथुरा* क्षेत्र शैशुनाग (शेषनाग) ई.पू. ११०- वृहदनाग (भारशुनाग), वीरसेननाग, भीमनाग, व्याघ्रनाग व अच्युतनाग ३) *विदिशा* क्षेत्र ई.पू. ९०- भोगीन (शैशुनाग पुत्र), चंद्रनाग (चंद्राष्म), वृत्तनाग, भूतनाग, धम्मनाग, सदाचंद्र, बंगरनाग, भूतनंदी व शिशुनंदी ४) *कांतिपुरी* क्षेत्र- ऐशनंदी, पुरुषदत्त, उत्तमदत्त, शिवदाता, भवदाता, कामदाता व शिवनंदी ५) *एरण* क्षेत्र (सागर/अहिछत्र)- अहिनाग, नागसेन, नागदत्त, भावनाग व ईश्वरसेन ६) *त्रिपुरी* क्षेत्र (जबलपूर) ई.पू. ९० बोधीवंश, सुबोधी, वसुबोधी व चंद्रबोधी ७) *बघेलखंड* ई.पू. ११०- भीमसेन, भद्रसेन व शिवमध (मध वंश) ८) *कोसांबी* ई.पू. ११०- असद सेन, ध्रुवमित्र, सूर्यमित्र, फाल्गुनमित्र, भानूमित्र, भूमिमित्र, अग्निमित्र, जयमित्र, इंद्रमित्र व विष्णूमित्र. ९) *मगध* क्षेत्र- वृहस्पती मित्र, रुद्रगुप्त, भद्रघोष व वंसपाल. ई.पू. प्रथम शताब्दी या नवनाग राजांनी आपली विकसित उपस्थिती इतिहासात दर्ज केली आहे. त्यांनी शुंग, कण्व व शक छत्रपांशी २१ वेळा युद्ध करून विजय मिळवली आणि आपले स्वतंत्र राज्य उभारून भव्य किल्ले, नगर व टकसाल स्थापित करून आपले क्षेत्र विकसित केले. या सर्वांचा राजधर्म बौद्ध धम्म होता हे त्यांच्या मूर्तिकला वर उत्कीर्ण आहे. बुद्धाच्या शिष्मावर तीन नागफणी, पाच, सात व नौ नागफणी छत्र यांच्या काळकीर्तीत निर्मित झाल्या. हे पुरा. उत्खननातून सिद्ध होते. यांची उत्पत्ती पातालपूर (पाताळ लोक) अर्थात नागलोक म्हणजेच महारलोक असे वर्णन महाभारत वनपर्व, अध्याय २५२ मध्ये उल्लेख आहे. पद्मावती (पद्मपवैया) पुरा. स्थली जनरल कनिंघम नि शोधून काढले. सध्या ग्वालियर-शिवपुरी मार्गावर "डबरा" करावती पासून १० कि.मी. पूर्वोत्तर १० हेक्टर क्षेत्रात पसरलेली पुरा. स्थली आहे. गंगा, सिंधू, पार्वती नदीच्या त्रिवेणी संगमावर विशाल किला ई.पू. प्रथम शताब्दीचा सापडला आहे. नगराच्या दोन्ही बाजूस नदीचा जल प्रवाह व उरलेल्या दोन्ही बाजूस २० फूट खोली ची व ११८ फूट रुंदीची खंदक सापडली. त्यात नदी चे पाणी भरून राहत असावे अशी सुरक्षा ची व्यवस्था आधी मगधाच्या पाटलीपुत्र राजनगराची हि होती. हे सुरक्षा खंदक बघून आंतील नगराची सुव्यवस्था व अनुशासित वसाहतीचा आभास होतो. अति वर्ष मुळे किल्लाच्या भिंतीवर घोंग्या सारखे त्यांचे नाणी (शिक्के) चमकतांना दिसतात. जनरल कनिंघम नि ई.स. १८८० ला इथे १८०० शिक्के प्राप्त झाले. त्यांचे अध्ययन करून त्यांनी सिद्ध केले, इथे नवनाग राजांचे विशाल टकसाल होते. प्रगत झालेले हे नवनाग शासक गणतंत्रीय प्रणाली संवर्धक होते. म्हणूनच यांचा कोणीच केंद्रीय सत्ताधीश इतिहासात नोंदल्या गेला नाही. मौर्य सत्ता शक्ती क्षीण होताच उत्तरापथ, पश्चिमापथ, दक्षिणापथ, पुर्विपथ व नवनागांचा मध्य प्रांत वेग वेगळे शासक इतिहासात प्रदर्शित होतात.

**संदर्भ: १) प्रा.भा.शा.ना.उ.उ.इ. - डॉ. नवल वियोगी २) प्रा.भा.इ. - मा.म. देशमुख**

**शब्दांकन : डी के देशभ्रतार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका**

# छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा आणि शिवसृष्टी उभारण्यासाठी भूखंड न दिल्यास सिडको आणि आमदारांच्या घरावर मोर्चा - लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ईशारा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** सिडकोने देवस्थानाच्या संस्थांना नाममात्र दरात भूखंड दिले आहे त्याचप्रमाणे उलवेनोडमध्ये अटलसेतू जवळ छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा आणि शिवसृष्टी उभारण्यासाठी भूखंड न दिल्यास सिडको आणि आमदारांच्या घरावर मोर्चा काढण्यात येईल, असा ईशारा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आज (दि. १९) उलवेनोड येथे दिला. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती गव्हाण यांच्या वतीने उलवे नोड येथे भव्य शिवजयंती उत्सव संपन्न झाला. त्यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भाषणात पुढे बोलताना म्हंटले कि, महाराष्ट्र धर्म वाढविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी अपरिमित त्याग केला. त्यामुळे शिवरायांची जयंती साजरी करणे आपले कर्तव्य आहे. उलवेनोड मध्ये महाराजांचा अश्वारूढ पुतळा व शिवसृष्टी उभारणीसाठी छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीची २०१८ मध्ये स्थापना करण्यात आली. आणि त्या अनुषंगाने छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यासाठी गेली अनेक वर्षे पाठपुरावा करूनही सिडको या पवित्र कार्यासाठी भूखंड देत नाही, उलट या समाजोपयोगी भूखंडासाठी सिडको पाच कोटी रुपये आपल्याकडून मागत आहे. त्यामुळे सिडकोच्या या भूमिकेचा धिक्कार व्यक्त करत आहे. सरकार सहानुभूतीशीर आहे पण सिडकोचे अधिकारी हे झारीतले शुक्राचार्य आहेत. तिरुपती मंदिरासाठी १ रुपये दराने जागा दिली गेली आहे, पण आपल्याकडून मात्र पैशांची मागणी



केली जात आहे. हे अत्यंत दुर्दैवी आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे कार्य अत्यंत पवित्र असून, कोणत्याही अडथळ्यापासून ते रोखले जाऊ नये. हा महाराष्ट्राचा आणि संपूर्ण देशाचा गौरव आहे. त्यामुळे २६ जानेवारी २०२७ पर्यंत भूखंड मिळाला नाही तर सिडको त्याचबरोबर आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या घरावर मोर्चा काढू,असे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नमूद केले.

यावेळी महेंद्र घरत म्हणाले, जगाचे मॅनेजमेंट गुरू म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. शिवरायांचा जगालाही सार्थ अभिमान आहे. ज. आ. भगत साहेब यांनी १९८१ मध्ये शिवरायांचा पुतळा कोपर फाट्यावर उभारला आहे. आता आपल्याला शिवरायांचा अश्वारूढ पुतळा अटल सेतू जवळच उभारायचा आहे. कारण रयतेचे राजे एकच म्हणजे शिवाजी महाराज. महिलांचा सन्मान करणारे एकमेवाद्वितीय शिवाजी महाराज. त्यांच्यामुळेच आपण आज सन्मानाने जगतोय. त्यामुळे शिवरायांचा अश्वारूढ पुतळा उभारणे ही आपली अस्मिता आहे. सिडकोच्या एमडींना तीन वेळा येथे आणले आपला इतिहास हा आंदोलनांचा आहे. जर एक रुपया दराने भूखंड मिळाला नाही, तर सिडकोच्या अधिकाऱ्यांविरोधात तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर एकदा ठरवतात ते कार्य पूर्ण केल्याशिवाय थांबत नाहीत, त्यामुळे या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आणि शिवसृष्टी उभारल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाही, असेही ठामपणे अधोरेखित करण्यात आले.

सकाळी गव्हाणहून वाद्यगजर, भगवे ध्वज आणि "शिवरायांचे जयघोष" करत भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक उलवे नोडमधील खारकोपर रेल्वे स्थानकाजवळील रामशेठ ठाकूर मैदानात पोहोचली, जिथे संपूर्ण वातावरण शिवमय झाले होते. मुख्य जयंती सोहळ्यात शिवप्रतिमेचे पूजन, माल्यार्पण आणि अभिवादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, तसेच भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, समितीचे अध्यक्ष वसंत पाटील, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, वितेश म्हात्रे, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, जयवंत देशमुख, रविशेठ पाटील, विश्वनाथ कोळी, हेमंत ठाकूर, अनंता ठाकूर, अशोक कडू, गजानन घरत, चिंतामणी घरत, भार्गव ठाकूर, साईचरण म्हात्रे, योगिता भगत, मीनाक्षी पाटील, ज्योत्स्ना ठाकूर, किशोर पाटील, यांच्यासह उपस्थित शिवप्रेमींनी केले. मान्यवरांनी युवकांना आवाहन केले की, शिवचरित्राचा गौरव करत, शिवरायांचे विचार आणि आदर्श जीवनात आत्मसात करावे आणि समाजाच्या कल्याणासाठी पुढाकार घ्यावा. या उत्सवात परिसरातील ग्रामस्थांनी आणि विविध सामाजिक संस्थांनी सक्रिय सहकार्य दिले, ज्यामुळे कार्यक्रम यशस्वी रीत्या पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन व व्यवस्थापन जयंती समितीने उत्कृष्टरित्या केले. उलवे नोडमधील छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव हा स्थानिक समाजासाठी प्रेरणादायी आणि ऐतिहासिक संस्कृती जपण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला आहे.

या उत्सवासाठी छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समिती तसेच गव्हाण, कोपर, शेलघर, शिवाजीनगर, बेलपाडा, न्हावा, न्हावाखाडी, उलवे, वहाळ, मोरावे, बामणडोंगरी, जावळे व उलवेनोड येथील ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

## छ.शिवाजी महाराज जयंतीनिमित्त नांदगाव तांड्यात 'छ.शिवाजी महाराज पानंद रस्ता'चे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे :** सोयगाव तालुक्यातील नांदगाव तांडा येथे रायतेचे राजे,हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधत ग्रामपंचायत मौजे नांदगाव तांडा येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज योजनेंतर्गत साकारण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज पानंद रस्ता' या रस्त्याचे लोकार्पण उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

या विकासकामाचे उद्घाटन पंचायत समिती नवनिर्वाचित सदस्यां सौ.सविताताई सोपान




गव्हाडे/पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमास नांदगाव तांडा येथील सरपंच आरुणाताई कैलास पवार उपसरपंच अहमद शेख ग्रामसेवक ननावरे मॅडम,प्रतिष्ठित व्यक्ती कैलास आप्पा पवार तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.शिवजयंतीच्या पावन दिनी झालेल्या या उद्घाटनामुळे गावात विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज योजनेंतर्गत ग्रामीण भागातील दळणवळण सुलभ व्हावे, शेतकऱ्यांना शेतापर्यंत पोहोचण्यासाठी उत्तम रस्ता उपलब्ध व्हावा आणि गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी या उद्देशाने पानंद रस्त्याची निर्मिती करण्यात आली आहे.

या रस्त्यामुळे शेतकरी व ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार असून शेतीमालाची वाहतूक अधिक सोयीस्कर होणार आहे.उद्घाटन प्रसंगी बोलताना सौ.सविताताई गव्हाडे/पाटील यांनी सांगितले की,छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी दिलेला आदर्श डोळ्यासमोर ठेवून ग्रामविकासाची कामे प्राधान्याने राबवली जात आहेत.गावाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येऊन सहकार्य करणे आवश्यक आहे,असेही त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.ग्रामस्थांनी या विकासकामाबद्दल समाधान व्यक्त करत शासनाचे व लोकप्रतिनिधींचे आभार मानले. शिवजयंतीच्या निमित्ताने झालेले हे लोकार्पण नांदगाव तांड्याच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# नेरे येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर; ८२ जणांनी घेतला लाभ

**दैनिक युवक आधार**

**नेरे (प्रतिनिधी) :** Adani Foundation च्या वतीने तसेच ग्रामपंचायत सदस्य सौ. प्रगती फडके व सौ. सविता चोरगे यांच्या सहकार्याने, आणि सामाजिक कार्यकर्त्या हर्षदा मांडवकर व सौ. विशाखा कांबळे यांच्या मदतीने नेरे येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण ८२ नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. त्यामध्ये ६९ महिला, ७ पुरुष व ६ मुलांचा समावेश होता. शिबिरादरम्यान ४४ व्यक्तींची शुगर (रक्तातील साखर) तपासणी करण्यात आली. याशिवाय सामान्य आरोग्य तपासणी, रक्तदाब तपासणी आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.या उपक्रमास नेरेचे सरपंच



श्री. प्रकाश घाडगे तसेच ग्रामपंचायत सदस्य श्री. शैलेश पाटील यांनी भेट देऊन शिबिराचे कौतुक केले व आयोजकांचे अभिनंदन केले. ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात आणि वेळेवर तपासणी होऊन आजारांचे निदान व्हावे या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. ग्रामस्थांनी भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

## पिंपळगाव बसवंतमध्ये शिवजयंतीचे औचित्य साधत 'शिवसृष्टी' प्रकल्पाचे जल्लोषात भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी- (पिंपळगाव बसवंत) :** पिंपळगाव बसवंत -शिवजयंतीच्या पावन दिनाचे औचित्य साधत पिंपळगाव बसवंतमध्ये 'शिवसृष्टी' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमिपूजन जल्लोषात पार पडले. हा ऐतिहासिक सोहळा आ. दिलीप काका बनकर यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमामुळे पिंपळगाव बसवंतच्या विकासयात्रेला नवे बळ मिळाल्याची भावना नागरिकांमध्ये दिसून आली.शिवजयंतीनिमित्त



आयोजित या कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी आमदार दिलीप काका बनकर यांच्या हस्ते नारळ वाढवून कुदळ मारत भूमिपूजन विधी पार पडला. पारंपरिक विधी आणि घोषणांनी संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

भूमिपूजनानंतर भव्य छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे विधीवत पूजन करण्यात आले. त्यानंतर जिल्ह्याच्या विविध भागांतून आलेल्या राजकीय, सामाजिक व प्रशासकीय प्रतिनिधींनी आपले मनोगत व्यक्त करत शिवसृष्टी प्रकल्पाचे महत्त्व अधोरेखित केले.

मान्यवरांनी बोलताना सांगितले की, आमदार दिलीप काका बनकर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे पिंपळगाव बसवंतचा चेहरा-मोहरा बदलत असून शिवसृष्टी प्रकल्प इतिहास, संस्कृती आणि प्रेरणेला चालना देणारा ठरणार आहे. हा प्रकल्प भविष्यातील पिढ्यांसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. उत्साहपूर्ण घोषणा, सांस्कृतिक वातावरण आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा सोहळा अविस्मरणीय ठरला. जल्लोषमय वातावरणात पार पडलेला हा कार्यक्रम पिंपळगाव बसवंतच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात असून विकासाच्या दिशेने टाकलेले हे पाऊल दीर्घकालीन परिणाम घडवणारे ठरेल, असा सूर उपस्थितांमध्ये होता.



**ओम साई खान्देश्वर महिला व बालमित्र मंडळ आयोजित शिवजयंती उत्सावास पनवेलचे महापौर नितीन पाटील रायगड जिल्हा भाजप अध्यक्ष अविनाश कोळी इत्यादी मान्यवरानी भेट दिली यावेळी नगरसेविका सिताताई पाटील यांनी त्यांचे स्वागत केले** **( दैनिक युवक आधार )**

# शिपाई भरती व कर्मचारी नियुक्ती वादावर पडदा; प्रशासनाच्या ग्वाहीनंतर आमरण उपोषणाची सकारात्मक सांगता

## ग्रामपंचायत निर्णय स्पष्ट; अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने तणाव निवळला

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्स्ना करवाडे/विदर्भ संपादिका :** ग्रामपंचायत वनोजा येथील कर्मचारी नियुक्ती प्रक्रियेवरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर पंचायत समिती राळेगाव कार्यालयासमोर सुरू असलेल्या आमरण उपोषणाची अखेर सकारात्मक सांगता झाली. प्रशासनाने दिलेल्या स्पष्ट ग्वाहीमुळे आणि ग्रामपंचायतीची भूमिका स्पष्ट झाल्यानंतर उपोषणकर्ते जितेंद्र खोडे, विकास घिनमिने, सुरज किन्हेकर आणि श्रीकांत बेलखडे यांनी प्रशासनावर विश्वास व्यक्त करत उपोषण मागे घेतले.

ग्रामपंचायत वनोजा येथे कर्मचारी नियुक्तीबाबत ग्रामपंचायत सभेत चर्चा होऊन संबंधित कर्मचाऱ्याला रोजंदारी तत्त्वावर कामावर घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

स्थायी नियुक्तीबाबत कोणताही अंतिम निर्णय झालेला नसल्याने काही गैरसमज निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर संतप्त युवकांनी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते.

यासंदर्भात गटविकास अधिकारी केशव पवार व ग्रामपंचायत सचिव सुबोध चांगले यांनी प्रशासनाची भूमिका स्पष्ट करत, संबंधित प्रकरण न्यायालयीन






प्रक्रियेशी निगडित असण्याची शक्यता असल्याने सध्या स्थायी नियुक्ती करणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले. शासन नियम व ग्रामपंचायत सभेच्या मंजुरीनंतरच पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशी ठोस ग्वाही प्रशासनाकडून देण्यात आली.

प्रशासनाच्या या स्पष्ट भूमिकेनंतर आणि सकारात्मक संवादामुळे उपोषणकर्त्यांनी प्रशासनाच्या आश्वासनावर समाधान व्यक्त केले व उपोषणाची सांगता करण्याचा निर्णय घेतला. यावेळी विस्तार अधिकारी म्हस्के, ग्रामपंचायत सरपंच मालुताई कोटनाके, ग्रामपंचायत सचिव सुबोध चांगले, माजी उपसरपंच प्रफुल तायवाडे, विदर्भ संपादिका ज्योत्स्ना करवाडे, गजानन मुरस्कार,अविनाश बेलखडे,सतिश वाळके,दिनेश कोटनाके,लक्ष्मीकांत उत्तरवार व इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मध्यस्थीमुळे तोडगा, संवादातून निर्माण झाला विश्वास**

ग्रामपंचायत वनोजा येथील कर्मचारी नियुक्ती वादावर तोडगा काढण्यात विस्तार अधिकारी म्हस्के, ग्रामपंचायत सचिव सुबोध चांगले आणि दैनिक युवक आधारच्या विदर्भ संपादिका ज्योत्स्ना करवाडे यांनी पुढाकार घेत महत्त्वाची भूमिका बजावली. उपोषणकर्ते जितेंद्र खोडे, विकास घिनमिने, सुरज किन्हेकर आणि श्रीकांत बेलखडे यांच्याशी समन्वय साधत प्रशासन व ग्रामपंचायत यांच्यात सकारात्मक संवाद घडवून आणण्यात आला. प्रशासनाची स्पष्ट भूमिका आणि माध्यमांच्या सकारात्मक हस्तक्षेपामुळे उपोषणकर्त्यांचा विश्वास निर्माण झाला आणि तणावपूर्ण परिस्थिती शांततेत निवळून आमरण उपोषणाची सकारात्मक सांगता झाली.

## अदानी पनवेल रियालिटी प्रोजेक्टमध्ये जिल्हा परिषद शाळांच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी Adani Groupच्या पनवेल रियालिटी प्रोजेक्ट परिसरात सामाजिक बांधिलकी जपत जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. लोणी येथील सेल्स ऑफिसमध्ये पार पडलेल्या या उपक्रमात पाली, लोणीवली, वांगणी, नेरे, चेरवली आणि वाजे या सात जिल्हा परिषद शाळांतील सुमारे ५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या स्पर्धेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपल्या कल्पकतेला व कलागुणांना वाव मिळाला. विद्यार्थ्यांनी पर्यावरण, स्वच्छता, शिक्षण, भारताची संस्कृती अशा विविध विषयांवर सुंदर चित्रे साकारत उपस्थितांचे मन जिंकले.

या कार्यक्रमासाठी अदानी



सीएसआर विभागाचे श्री. सुबोध सिंग तसेच पनवेल रियालिटीचे प्रतिनिधी श्री. राजू बोडल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे मुलांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन व नियोजन सीएसआर विभागाच्या 'संगिनी' टीमने यशस्वीपणे पार पाडले, त्यासाठी पनवेल रियालिटी चे श्री गणेश गीते व त्यांच्या टीमचे मोलाचे सहकार्य लाभले. स्पर्धेअंती विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व प्रोत्साहनपर भेटवस्तू देण्यात आल्या.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून अदानी समूहाच्या सामाजिक उपक्रमांचे सर्वत्र स्वागत करण्यात येत आहे.